पाक्षिक

प्रदेश बीजेपी

# मनोगत

मुंबई ● वर्ष: 8 ● अंक: 8 ● 16 एप्रिल 2026 ● पृष्ठसंख्या: 36 ● किंमत: 5 रू.



## मोदी सरकारमुळे

# नक्षलमुक्त भारत




अध्यक्षीय मनोगत

# मोदी सरकारचे अभिनंदन

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी अलिकडेच संसदेत बोलताना देशातील नक्षलवाद पूर्णपणे संपुष्टात आल्याचे जाहीर केले. मोदी सरकारने नक्षलमुक्त भारताचा संकल्प केला होता. त्याप्रमाणे नक्षलवाद्यांचे पूर्णपणे उच्चाटन करण्याचे ध्येय मोदी सरकारने साध्य केले आहे, याबद्दल मोदी सरकारचे अभिनंदन. नक्षलवाद्यांचा हिंसाचार, दहशत वर्षानुवर्षे निमुटपणे सहन करणारे गोरगरीब आदिवासी बांधव मोदी सरकारला मनापासून धन्यवाद देत आहेत. छत्तीसगड, महाराष्ट्र, ओडिशा, आंध्र प्रदेश, बिहार, झारखंड यासारख्या अनेक राज्यांमध्ये नक्षलवाद्यांनी दहशतीच्या जोरावर आपले साम्राज्य उभे केले होते. नक्षलवाद्यांच्या दहशतीमुळे या भागात सरकारच्या विकास योजना पोहचू शकत नव्हत्या. १९७० पासून देश नक्षलवाद्यांशी झुंज देतो आहे. नक्षलवाद्यांच्या हिंसाचारात हजारो सामान्य नागरिक आणि पोलीस कर्मचारी ठार झाले आहेत. २०१४ मध्ये केंद्रात सत्ता आल्यानंतर मोदी सरकारने नक्षलवाद्यांचा बीमोड करण्याचा निर्धार जाहीर केला. देशाला पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांएवढाच नक्षलवाद्यांचा धोका आहे. देशावर अनेक वर्षे राज्य करणाऱ्या काँग्रेसने नक्षलवाद्यांचा बंदोबस्त करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केलेच नाहीत. संसदेमध्ये केलेल्या भाषणात आपले नेते व केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी नक्षलवाद्यांचा उदय कम्युनिस्ट पक्षांच्या आशीवार्दाने कसा झाला, हे विस्ताराने नमूद केले होते. गरीबीमुळे नक्षलवादाचा जन्म झाला, असा युक्तिवाद अनेक विचारवंत, बुद्धिवंत, पत्रकार मंडळींकडून केला जात होता. अमित शाह यांनी या युक्तिवादाची प्रभावी चिरफाड केली. नक्षलवाद्यांमुळे देशातील २० कोटी लोकसंख्येचा भूभाग (रेड कॉरिडॉर) विकासापासून वंचित राहण्यात कसा झाला आणि त्यामुळे या भागातील दारिद्र्य वाढले, असे अमित शाह यांनी दाखवून दिले. गेल्या १२ वर्षात मोदी सरकारने राज्य सरकारांच्या सहकार्याने नक्षलवाद्यांची पुरती कोंडी केली. त्यामुळे नक्षलवाद्यांचे अनेक नेते सरकारला शरण आले. त्यावेळी नक्षलवाद्यांचे समर्थन करणारी मंडळी मानवतेचा मुद्दा पुढे करत नक्षलवाद्यांशी चर्चा करण्याचा आग्रह धरू लागली. नक्षलवाद्यांनी आजवर हजारो लोकांचे बळी घेतले, त्यावेळी या विचारवंतांना, पत्रकारांना मानवतेची आठवण झाली नाही. मात्र आता नक्षलवाद्यांना वाचवण्याचा कोणताही मार्ग दिसत नसल्याने या मंडळींनी मानवतेची ढाल पुढे केली. हिंसाचार करणाऱ्या नक्षलवाद्यांना कदापि माफ केले जाणार नाही, असे मोदी सरकारने वारंवार स्पष्ट केले होते. नक्षलवाद्यांचा सामना करणाऱ्या केंद्र आणि राज्य सरकारच्या सुरक्षा दलांना मोदी सरकारने अत्याधुनिक शस्त्रे पुरवली. केंद्र सरकारचा संपूर्ण पाठिंबा असल्यामुळे सुरक्षा दलाने अनेक नक्षलवाद्यांना समर्पण करण्यास भाग पाडले. शरण न येणाऱ्या नक्षलवाद्यांचा कोणतीही दया–माया न दाखवता खात्मा करण्यात आला. छत्तीसगडमधील बस्तर, महाराष्ट्रातील गडचिरोली, चंद्रपूर हा भाग आता नक्षलवाद्यांच्या दहशतीतून पूर्णपणे मुक्त झाला आहे. या भागात केंद्र आणि राज्य सरकारांच्या वेगवेगळ्या विकास योजना पोहचू लागल्या आहेत. गोरगरीब, भाबड्या आदिवासी बांधवांना मोदी सरकारच्या कल्याणकारी योजनांचा लाभ मिळू लागला आहे. नक्षलमुक्त भारतामुळे जगाला नव्या, सशक्त भारताचे दर्शन घडले आहे.

**रविंद्र चव्हाण**

# अंतरंग





संपादक : गणेश हाके
सल्लागार : माधव भांडारी
आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,
bjpmaha.manogat@gmail.com
editor.bjpmanogat@gmail.com
येथे पाठवाव्यात.

संपादकीय सल्लागार

चंद्रहास मिरासदार
सजावट व मांडणी : गौतम आर्य
सहाय्यक : प्रेरणा तळेकर-वीर

विभागीय समन्वयक

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी
विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे
पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर
उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे



नक्षलमुक्त भारत ०४



गरिबीमुळे नक्षलवाद पसरला हा गैरसमज १४




महिला सक्षमीकरणाचे स्वप्न साकार होणार १६



२०२९ मध्ये संपूर्ण यशाचा संकल्प पूर्ण करायचा आहे २१



डॉ. बाबासाहेब आंबेडकर - द्रष्टे अर्थतज्ज्ञ २८




भारताने गाठला अणुऊर्जा प्रवासातील महत्त्वाचा टप्पा ३०




हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई – ४००० २० येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, नरिमन पॉईंट, मुंबई –२० येथे प्रकाशित केले. संपादक : गणेश हाके, संपर्क : ०२२–२२०२२०५०



# नक्षलमुक्त भारत


● **अमित शाह**, केंद्रीय गृहमंत्री

१२ राज्यांमधील २० कोटी लोकसंख्येचा भाग 'रेड कॉरिडॉर' म्हणून ओळखला जात होता. या भूभागातील सर्व आदिवासी बंधू आणि भगिनींची अशी इच्छा होती की, त्यांची पिळवणूक करणाऱ्या, त्यांच्या अन्याय करणाऱ्या नक्षलवाद्यांच्या व्यवस्थेवर देशाच्या लोकशाहीचे सर्वोच्च व्यासपीठ असलेल्या संसदेमध्ये चर्चा व्हावी. या चर्चेतून आपल्यावर वर्षानुवर्षे झालेला अन्याय संपूर्ण जगाला कळावा असे त्यांना मनोमन वाटत होते. त्यांच्या मनातली इच्छा दीर्घकाळानंतर आज पूर्ण होत आहे. १९७० पासून देशापुढे नक्षलवादाची समस्या उभी राहिली.



**१९७०** ते २०२६ या ५६ वर्षांच्या काळात काय–काय घडले यावर संसदेमध्ये विस्ताराने चर्चा होत आहे, ही माझ्या दृष्टीने आणि माझ्या आदिवासी बांधवाच्या दृष्टीने आनंदाची गोष्ट आहे. गोरगरीब आदिवासींच्या भोळेपणाचा, अज्ञानाचा फायदा घेऊन नक्षलवादी शक्तींनी आदिवासी बांधवाच्या मनात विद्वेष पसरवला. तुम्हाला फक्त आम्हीच न्याय देऊ शकतो, तुमची सर्व स्वप्ने आम्हीच पूर्ण करू शकतो, असे चित्र या नक्षलवादी शक्तींनी उभे केले. तुमच्यावर या देशात अन्याय होत असून हा अन्याय दूर करण्यासाठी आम्ही लढणार आहोत, असा खोटा समज त्यांनी तयार करून दिला. खोटे–नाटे सांगून आदिवासींच्या मनात या देशाविषयी, इथल्या व्यवस्थेविषयी विष पेरण्याचे काम नक्षलवादी शक्तींनी अत्यंत पद्धतशीरपणे केले. त्याचे दुष्परिणाम संपूर्ण देशाला अनेक वर्षे भोगावे लागले. मोदी

## नक्षलवाद्यांच्या हिंसाचारातील बळी





सरकारने गेल्या १२ वर्षात नक्षलवाद संपवून टाकण्याच्या निर्धाराने नियोजनबद्ध प्रयत्न केले. या प्रयत्नांमुळे नक्षलवादी शक्तींचा येथे सर्वात मोठा प्रभाव होता त्या बस्तर भागातून नक्षलवादाचे जवळ-जवळ पूर्णपणे उच्चाटन झाले आहे. बस्तर भागात विकासाचा मुख्य प्रवाह नेण्यासाठी आमच्या सरकारने केलेल्या प्रयत्नांना यश आले आहे. तेथील प्रत्येक गावात शाळा सुरू करण्यासाठी, प्रत्येक गावात स्वस्त धान्य दुकान (रेशन) सुरू करण्यासाठी प्रयत्न केले गेले. प्रत्येक तालुक्यात आणि पंचायतीमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू करण्यासाठी प्रयत्न झाले. आदिवासी बांधवांना आधार कार्ड देण्यात आले, रेशन कार्ड देण्यात आले. या माध्यमातून त्यांना दरमहा ५ किलो अन्न-धान्य मिळू लागले आहे. घरोघरी गॅस शेगड्याही देण्यात येत आहे. गोरगरीब आदिवासी बांधवांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आमच्या सरकारने आवश्यक ते सारे प्रयत्न संपूर्ण ताकदीने केले.

जी मंडळी नक्षलवाद्यांचे संमर्थन करतात त्यांना मी एक प्रश्न विचारतो, आम्ही जे काम नक्षलवादी भागातील आदिवासींसाठी गेल्या १२ वर्षात केले आहे ते काम १९७० पासून का झाले नव्हते. २०१४ नंतर देशात मोदी सरकार सत्तेत आल्यानंतर प्रत्येक गरीबाला मालकीचे घर देण्यासाठी प्रयत्न झाले, कोट्यवधी महिलांना गॅस सिलेंडर देण्यात आले, घराघरात पिण्याचे पाणी देण्यासाठी योजना सुरू झाली. असे असताना बस्तरच्या जनतेला मोदी सरकारच्या योजनाचा लाभ का मिळाला नव्हता, असा प्रश्न खोडसाळपणे विचारला जात होता. मोदी सरकारच्या गोरगरिबांसाठीच्या योजनांचे लाभ बस्तरच्या जनतेला मिळत नव्हते कारण या भागात नक्षलवादी शक्तींची प्रचंड दहशत होती. आमच्या सरकारच्या प्रयत्नांमुळे बस्तरवरील दहशतवादाची छाया संपली आहे. आता बस्तर भागाचा

### नक्षलग्रस्त भागांमध्ये १७ हजार ५८९ कि.मी. लांबीचे रस्ते

**पंतप्रधान मोदीजींच्या नेतृत्वाखालील सरकारने २०१४ पासून नक्षलग्रस्त भागांमध्ये १७,५८९ किलोमीटर लांबीचे रस्ते बांधण्यास मंजुरी देण्यात दिली आहे, त्यापैकी १२,००० किलोमीटर रस्त्यांचे बांधकाम यापूर्वीच पूर्ण झाले आहे. नक्षलवादाचे हळूहळू उच्चाटन होत असल्यामुळेच विकासकामे वेगाने पुढे सरकत आहेत. मोदी सरकारने ६,००० कोटी रुपये खर्च करून जवळपास ५,००० मोबाईल टॉवर्स उभारले आहेत. मोदी सरकारने आणखी दोन योजनांतर्गत ८,००० नवीन '4G' टॉवर्स उभारण्याचा निर्णयही घेतला आहे.**

## अटक झालेले माओवादी / नक्षलवादी





वेगाने विकास होत आहे. आदिवासींवर अन्याय होत आहे म्हणून आम्ही हातात शस्त्रे घेतली असे नक्षलवाद्यांकडून सांगितले जात होते. याचा अर्थ नक्षलवाद्यांना भारतीय संविधानावर विश्वास नव्हता. आपल्या संविधानात सामान्य माणसावरचा अन्याय दूर होण्यासाठी आवश्यक ती व्यवस्था निर्माण करण्याची क्षमता आहे. मात्र संविधानावर विश्वास न ठेवता या मंडळींनी हिंसाचार चालू केला. हा हिंसाचार कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही, हे मोदी सरकारने कृतीने दाखवून दिले. देशावर काँग्रेसची अनेक वर्षे सत्ता होती. काँग्रेसने आदिवासी जनतेच्या कल्याणासाठी काहीच केले नाही. या भागात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नव्हती, शिक्षणाची सुविधा नव्हती, बँका नव्हत्या. मोदी सरकारने नक्षलवाद्यांचा बंदोबस्त करीत असतानाच या भागात विकासाची गंगा नेली.

छत्तीसगड, तेलंगणा, आंध्र प्रदेश, ओडिशा, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, झारखंड, बिहार, पश्चिम बंगाल, केरळम, कर्नाटकचा काही भाग, उत्तर प्रदेशचे तीन जिल्हे हा संपूर्ण भाग नक्षलवाद्यांच्या प्रभावाखाली होता. या 'रेड कॉरिडॉर'मध्ये कायद्याचे राज्य नव्हते. या भागातील २० कोटी लोक किमान नागरी सुविधांपासून वंचित राहिले होते. मात्र त्याची कोणालाच फिकिर नव्हती. १९७० पासून या भागात झालेल्या हिंसाचारामुळे हजारो जणांचा मृत्यू झाला. शेकडो युवक ठार झाले. केंद्राचे आणि राज्य सरकारचे अनेक पोलीस कर्मचारीही या हिंसाचारात मृत्युमुखी पडले. नक्षलवाद ही देशापुढची अत्यंत गंभीर समस्या बनली होती. मात्र त्याचे गांभीर्य काँग्रेस आणि भाजपा विरोधी शक्तींना नव्हते. या हिंसाचाराचे अनेकांनी वर्षानुवर्षे समर्थन केले. या हिंसाचारात बळी पडलेल्या निष्पापांच्या मृत्यूला जबाबदार कोण आहे, याचे उत्तर नक्षलवाद्यांचे समर्थन करणारी मंडळी देत नाहीत. विकासापासून वंचित राहिल्यामुळे 'रेड कॉरिडॉर'मध्ये हिंसाचार होत नव्हता, हे कायम लक्षात ठेवले पाहिजे. डाव्या, कम्युनिस्ट विचारधारेमुळे हा हिंसाचार होत होता. काश्मीर आणि ईशान्य भारतातील दहशतवादापेक्षा 'रेड कॉरिडॉर'मधील हिंसाचाराची समस्या गंभीर आहे, असे


### नक्षलग्रस्त भागात बँक शाखांचे जाळे

**गेल्या १२ वर्षांत १,८०४ बँक शाखा उघडण्यात आल्या आहेत, १,३२१ एटीएम बसवण्यात आले आहेत, ३७,८५० 'बँकिंग कॉरेस्पॉन्डंट्स'ची (बँक प्रतिनिधींची) नियुक्ती करण्यात आली आहे आणि ६,०२५ टपाल कार्यालये सुरू करण्यात आली आहेत. हे सर्व केवळ १२ वर्षांच्या कालावधीत साध्य झाले आहे.**




विधान तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांनी जाहीरपणे केले होते. मात्र त्यांच्या सरकारने नक्षलवाद संपवून टाकण्यासाठी काहीच केले नाही. 'रेड कॉरिडॉर'मधील नक्षलवाद संपुष्टात आणण्यासाठी केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या जवानांनी विशेषत: 'कोब्रा', छत्तीसगडसह विविध राज्य सरकारचे पोलीस आणि

## माओवाद्यांच्या हिंसाचाराच्या घटना




स्थानिक आदिवासी जनतेने प्रचंड प्रयत्न केले. आदिवासी बांधवांची साथ मिळाली नसती तर 'नक्षलमुक्त' भारताची संकल्पना प्रत्यक्षात आली नसती. नक्षलवाद्यांविरुद्धच्या कारवाईत बळी पडलेल्या सुरक्षा दलाच्या जवानांना आणि

### २५९ 'एकलव्य आदर्श निवासी शाळा' उभारल्या

**मोदी सरकारने या भागात २५९ 'एकलव्य आदर्श निवासी शाळा' उभारल्या आहेत. यासोबतच, ४६ आयटीआय (ITIs), ४९ कौशल्य विकास केंद्रे आणि १६ कौशल्य विकास केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. गेल्या १२ वर्षांत आम्ही या सर्व बाबींवर सुमारे ८०० कोटी रुपये खर्च केले आहेत. नागरी कार्यक्रमांतर्गत, आरोग्य शिबिरे आणि औषधोपचारांशी संबंधित २१२ कोटी रुपयांची कामे हाती घेण्यात आली आहेत. आम्ही आदिवासी युवकांच्या आदानप्रदानासाठी (यूथ एक्सचेंज) विविध कार्यक्रमही सुरू केले आहेत. सुरक्षेच्या दृष्टीने, आम्ही सुरक्षा-संबंधित खर्च योजना सुरू केली; या योजनेअंतर्गत गेल्या १० वर्षांत राज्यांना ३,००० कोटी रुपयांचा निधी पुरवण्यात आला आहे. आम्ही 'विशेष पायाभूत सुविधा योजना'ही आणली आणि त्याअंतर्गत ५,००० कोटी रुपयांची तरतूद केली.**


### जवानांना ४०० बुलेट-प्रूफ आणि स्फोट-रोधक वाहने

**पंतप्रधान मोदीजींच्या १२ वर्षांच्या कार्यकाळात ५९६ सुसज्ज आणि सुरक्षित पोलीस ठाणी उभारण्यात आली आहेत. नक्षलग्रस्त जिल्ह्यांची संख्या, जी २०१४ मध्ये १२६ होती, ती आज केवळ दोनवर आली आहे. सर्वाधिक नक्षलग्रस्त जिल्ह्यांची संख्या, जी २०१४ मध्ये ३५ होती, ती आता शून्यावर आली आहे. ज्या पोलीस ठाण्यांच्या हद्दीत नक्षलवादी घटनांची नोंद होत असे, अशा ३५० पोलीस ठाण्यांची संख्या आज ६० पर्यंत खाली आली आहे. गेल्या ६ वर्षांत ४०६ नवीन केंद्रीय सशस्त्र पोलीस दल छावण्या उभारण्यात आल्या आहेत, ६८ रात्रीच्या वेळी विमानांचे लँडिंग होऊ शकेल असे हेलिपॅड्स बांधण्यात आले आहेत, आमच्या जवानांना ४०० बुलेट-प्रूफ आणि स्फोट-रोधक वाहने पुरवण्यात आली आहेत, जवानांसाठी पाच रुग्णालये बांधण्यात आली आहेत आणि संपूर्ण दळणवळण व्यवस्था अधिक सक्षम करण्यात आली आहे.**

राज्य सरकारच्या पोलीस कर्मचाऱ्यांना मी मन:पूर्वक श्रद्धांजली अर्पण करतो.

नक्षलवाद्यांना आणि त्यांना पाठिंबा देणाऱ्या लोकांना

## शरण आलेले नक्षलवादी




या भागाच्या विकासाशी काहीच देणे-घेणे नव्हते आणि अजूनही नाही. 'सत्यमेव जयते' हे आपल्या संविधानाचे आणि भारताचे ब्रीदवाक्य आहे. नक्षलवाद्यांचे, माओवाद्यांचे ब्रीदवाक्य,' बंदुकीच्या गोळ्यातूनच सत्ता मिळवता येते', असे आहे.

नक्षलवाद्यांमुळे १५,००० मुलांचे आयुष्य उद्धवस्त झाले आहे; याला जबाबदार कोण आहे? तुम्ही न्यायालयांच्या संरक्षणाखाली वातानुकूलित कक्षांमध्ये बसून लेख लिहिता, तर तिकडे लोकांचे आयुष्य मात्र उद्धवस्त झाले आहे आणि कोणालाही त्याची पर्वा नाही. जे लोक स्वतःला मानवाधिकार रक्षक समजतात, त्यांना हा प्रश्न विचारला पाहिजे की, ज्या मुलीला वयाच्या ३२ वर्षांपर्यंत हातावर 'मेहंदी' देखील लावता आली नाही, तिच्या मानवाधिकारांची काळजी कोण करणार? केवळ नरेंद्र मोदीजीच तिची काळजी घेतील, दुसरे कोणीही नाही. ज्यांनी या लोकांचे अधिकार हिरावून घेतले आहेत, त्यांना आज ना उद्या त्याचे उत्तर द्यावेच लागेल. ज्यांनी नक्षलवाद्यांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे-मग ते शब्दांतून असो किंवा छद्मवेशात-पाठिंबा दिला आहे, ते सर्वजण हातात बंदुका घेऊन फिरणाऱ्या नक्षलवाद्यांइतकेच या पापाचे समान भागीदार आहेत. कौशल्य विकास केंद्रे स्थापन करून आम्ही त्यांच्यासाठी रोजगार आणि नोकऱ्या उपलब्ध करून देण्याचे अनेक प्रयत्न केले आहेत. आम्ही त्यांच्या मुलांसाठी १२वी पर्यंतचे मोफत शिक्षण उपलब्ध करून दिले आहे. आम्ही महिलांसाठी २ लाख रुपये आणि पुरुषांसाठी ५ लाख रुपयांच्या कर्जाची व्यवस्था केली आहे. 'बस्तर ऑलिम्पिक्स' आणि 'बस्तर पांडुम' यांच्या माध्यमातून आम्ही तिथे संस्कृती आणि खेळांना प्रोत्साहन देत आहोत. 'बस्तर पांडुम'मध्ये १.२० लाखांहून अधिक कलाकारांनी सहभाग घेतला, तर क्रीडा स्पर्धांमध्ये ५.५० लाख आदिवासींनी भाग घेतला. जे लोक या संघर्षाला 'न्यायासाठीची लढाई' असे संबोधतात, त्यांनी 'बस्तर पांडुम' आणि 'बस्तर ऑलिम्पिक्स'ला नक्की भेट द्यावी.

विरोधी पक्षनेते त्यांच्या प्रदीर्घ राजकीय कारकिर्दीत अनेकदा नक्षलवाद्यांसोबत आणि त्यांच्या सहानुभूतीदारांसोबत दिसून आले आहेत. अनेक नक्षलवादी आघाडीच्या संघटनांनी 'भारत जोडो यात्रे'मध्ये सहभाग घेतला होता आणि याची रीतसर नोंद उपलब्ध आहे. २०१० मध्ये ओडिशामध्ये ते 'लाडो सिकोका' यांच्यासोबत एकाच मंचावर दिसून आले होते. त्याच मंचावरून सिकोका यांनी चिथावणीखोर भाषण दिले होते आणि विरोधी पक्षनेत्यांनी त्यांचा सत्कार करून त्यांना पुष्पहारही अर्पण केला होता. २०१८ मध्ये विरोधी पक्षनेत्यांनी हैदराबादमध्ये 'गुम्माडी विठ्ठल राव' ऊर्फ 'गद्दर' यांची भेट घेतली होती; गद्दर हे त्यांच्या विचारसरणीशी जवळीक साधणारे व्यक्ती होते. मे २०२५ मध्ये, त्यांनी 'शांतता

## आकर्षक पुनर्वसन धोरण


**मोदी सरकारने एक आकर्षक पुनर्वसन धोरण स्वीकारले आहे, ज्याअंतर्गत आत्मसमर्पण केल्यास ५०,००० रुपयांचे प्रोत्साहन दिले जाते; जर सामूहिक आत्मसमर्पण झाले, तर ही रक्कम दुप्पट केली जाते. सरकार या सर्वांना मोबाईल फोन पुरवते. शस्त्रे जमा केल्याबद्दल अतिरिक्त भरपाई दिली जाते. पुनर्वसन केंद्रांवर कौशल्य प्रशिक्षण आणि टूल किट्स (साधनांचे संच) पुरवले जातात. आम्ही त्यांना ३६ महिन्यांपर्यंत दरमहा १०,००० रुपये देतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या सर्वांना 'प्रधानमंत्री आवास योजने'अंतर्गत घरे भेट दिली आहेत. एखादे गाव नक्षलमुक्त होऊन तिथे पंचायत स्थापन होताच, त्या गावाच्या विकासासाठी १ कोटी रुपये दिले जातात.**

समन्वय समिती'ची भेट घेतली. त्यांनी सांगितले की, जेव्हा १७२ जवानांचा बळी घेणाऱ्या 'हिडमा'चा खात्मा करण्यात आला, तेव्हा 'इंडिया गेट' येथे अशा घोषणा दिल्या गेल्या होत्या: तुम्ही किती हिडमांना मारणार? प्रत्येक घरातून एक हिडमा जन्माला येईल! या घोषणांचा व्हिडिओ खुद्द विरोधी पक्षनेत्यांनीच समाजमाध्यमांवर (सोशल मीडियावर) शेअर केला होता.

नक्षलवाद्यांच्या समर्थकांनी १९७० पासून ते आज २०२६ पर्यंत नक्षलवादाला पाठिंबा दिला आहे. हा पाठिंबा म्हणजे एक प्रकारे नरसंहाराला दिलेला पाठिंबाच होय; आणि जर २०,००० लोकांच्या हत्येमागे एखादा गुन्हेगार असेल, तर ती म्हणजे मुख्य विरोधी पक्षाची 'डाव्या विचारसरणी' होय. नक्षलवाद्यांच्या सहवासात राहिल्यामुळे, हा पक्ष आणि या पक्षाचे नेते स्वतःच नक्षलवादी बनले आहेत. त्यांनी म्हटले की, या देशातील जनतेला आगामी निवडणुकांमध्ये याचे उत्तर द्यावे लागेल; कारण हे प्रकरण केवळ इथेच थांबणार नाही– तर ते थेट 'जनतेच्या दरबारात' जाईल.

२०२४ ते २०२६ या तीन वर्षांची एकत्रित आकडेवारी पाहिली, तर या कालावधीत चकमकींमध्ये एकूण ७०६ नक्षलवादी ठार झाले. २,२१८ नक्षलवाद्यांना अटक करून तुरुंगात पाठवण्यात आले, तर ४,८३९ जणांनी आत्मसमर्पण केले. विरोधक संवादाबद्दल (चर्चेबद्दल) बोलतात. प्रशासनाचा दृष्टिकोन असा असायला हवा की, ज्यांना चर्चा करायची आहे त्यांच्याशी संवाद साधला जावा; परंतु जे आपल्या जवानांवर, शेतकऱ्यांवर, आदिवासींवर आणि मुलांवर गोळ्या झाडतात, त्यांना मात्र गोळ्यांनीच प्रत्युत्तर दिले गेले पाहिजे. मोदी सरकारने संवाद, सुरक्षा आणि समन्वय या तिन्ही उपायांचा वापर केला आहे. अचूक पाळत ठेवण्यासाठी आम्ही अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर केला आणि मोठ्या संख्येने दूरध्वनींच्या संभाषणांचे (call records) विश्लेषण केले. गृह मंत्रालयाने 'लोकेशन ट्रॅकिंग सिस्टिम्स', मोबाईल फोनवरील हालचालींचा मागोवा, वैज्ञानिक 'कॉल लॉग्स', सोशल मीडियाचे विश्लेषण, तसेच न्यायवैद्यक (forensic) आणि तांत्रिक संस्थांच्या मदतीने या संपूर्ण मोहिमेचे नेतृत्व केले. ड्रोनद्वारे पाळत ठेवणे, उपग्रहांचा वापर, इमेजिंग तंत्रज्ञान आणि 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'वर (AI) आधारित डेटा विश्लेषण या माध्यमातून हे यश संपादन करण्यात आले आहे. आता देश नक्षलमुक्त झाला आहे, असे म्हणताना कोणताही संकोच वाटत नाही. त्यांचा सरचिटणीस असलेला 'बसवरजू', २७ लोकांचा बळी घेणारा हिडमा, ११ वर्षे सक्रिय असलेला गजुरेड्डा रवी, ४६ वर्षे सक्रिय असलेला कडारी सत्यनारायण रेड्डी, ४४ वर्षे सक्रिय असलेला गणेश उईके आता प्रभावहीन झाले आहेत. वेणुगोपालने आत्मसमर्पण केले आहे– तो ४६ वर्षे सक्रिय होता. वासुदेवने आत्मसमर्पण केले आहे– तो ३६ वर्षे सक्रिय होता. ४६ वर्षे सक्रिय असलेल्या पल्लुरी प्रसाद राव चंदना याने आत्मसमर्पण केले आहे. ३६ वर्षे सक्रिय असलेल्या रामदेव मांझी देबू याने आत्मसमर्पण केले आहे. ४४ वर्षे सक्रिय असलेल्या टिपरी तिरुपती यानेही आत्मसमर्पण केले आहे. सर्व प्रमुख सशस्त्र माओवादी नेत्यांचा खातमा करण्यात आला आहे.

नक्षलवाद्यांनी बंदुकीच्या जोरावर प्रचंड दहशत निर्माण केली होती. ग्रामीण भागातील अनेक निरपराध गावकऱ्यांना पोलिसांचा खबऱ्या ठरवून फासावर लटवण्यात आले. आपल्या देशात संविधानाने न्यायालयांना फाशी देण्याचा अधिकार दिला आहे. नक्षलवाद्यांना संविधान मंजूरच नव्हते. त्यामुळे ते कोणावरही कसलेही आरोप ठेवत फाशीसारख्या शिक्षा करत असत. माओवाद्यांनी



नक्षलवाद्यांचा प्रमुख नेता असलेल्या भूपतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीमध्ये आत्मसमर्पण केले.

'रेड कॉरिडॉर'मध्ये समांतर सरकार निर्माण केले होते. बस्तरसारख्या भागात त्यांचा गृहमंत्री असायचा, कायदा मंत्रीही असायचा. लुटलेले धान्य गोळा करण्यासाठी अन्न व पुरवठा मंत्रीही होता. भोळ्या भाबड्या जनतेच्या मनात विष कालवून सरकारबद्दल अविश्वास निर्माण करण्याचे काम नक्षलावाद्यांनी केले. सरकारची विकासाची कामे याच नक्षलवादी शक्तींनी बंद पाडली. नक्षलग्रस्त भागात ग्रामपंचायतीच्या निवडणुकासुद्धा होऊ शकत नव्हत्या. यांच्या दहशतीमुळे नागरीक मतदानाला सुद्धा बाहेर पडू शकत नव्हते. संविधानावर विश्वास नसणाऱ्या या नक्षलवाद्यांना अनेक बुद्धिवतांनी, विचारवंतांनी पाठिंबा दिला होता. नक्षलवाद्यांनी हिंसाचार अनेक लोकांना ठार मारले तरी या विचारवंतांनी, बुद्धिवतांनी माओवाद्यांचा निषेध करण्याची हिम्मत दाखवली नाही. सरकार आणि व्यवस्थेविरोधात असंतोष निर्माण करण्याची नक्षलवाद्यांची कार्यपद्धती होती. अशा नक्षलवाद्यांचे विचारवंतांकडून समर्थन केले जात होते. नक्षलवादाची चळवळ सुरू झाली त्याला पार्श्वभूमी होती कम्युनिस्ट पक्षातील फुटीची. १९६९ मध्ये मार्क्सवादी-लेनिनवादी कम्युनिस्ट पक्षाची स्थापना करण्यात आली. या पक्षाच्या घटनेमध्येच संसदीय लोकशाहीला विरोध करण्यासाठी सशस्त्र क्रांती करण्याच्या उद्देशाने या पक्षाची स्थापना करण्यात आल्याचे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. रशिया आणि चीनमध्ये ज्या पद्धतीने क्रांती करून राजेशाही उलथवण्यात आली त्याच पद्धतीने आम्ही सशस्त्र क्रांती करू, असे या पक्षाकडून सांगितले जात असे. मात्र भारतात राजेशाही नाही, संविधानाने निवडणुकीद्वारे सत्तेवर आलेले सरकार भारतात आहे. इंग्रजांविरुद्ध लढण्यासाठी सशस्त्र क्रांती आवश्यक होती. त्याला कोणी विरोध केला नव्हता. ज्या संसदेमध्ये बसून आपण देशासमोरील प्रश्नांची चर्चा करतो, या प्रश्नांची उत्तरे शोधतो ती संसदीय लोकशाहीची व्यवस्था माओवाद्यांना मान्य नाही. मार्क्सवादी-लेनिनवादी कम्युनिस्ट पक्षाने बिहार, आंध्र प्रदेशसह अनेक राज्यांमध्ये पाय पसरले होते. संसदीय लोकशाहीला विरोध करणाऱ्या, हिंसाचार करणाऱ्या माओवाद्यांना, नक्षलवाद्यांना अजूनही काही मंडळी पाठिंबा देतात. संविधानाबद्दल अविश्वास निर्माण करणाऱ्या नक्षलवाद्यांचे उदात्तीकरण करणे कृपा करून थांबवावे. माओवाद्यांना पाठिंबा देणारी मंडळी माओवाद्यांशी चर्चा करा, असे सातत्याने सांगत असतात. मात्र संविधान आणि संसदीय लोकशाही ज्यांना मंजूर नाही अशा शक्तींबरोबर चर्चा करण्यात अर्थ नाही. माओवाद्यांच्या हिंसाचारापासून निरपराध जनतेचे रक्षण करण्यासाठी बळाचा वापर करणेच योग्य आहे. नक्षलवाद्यांनी निरपराध ग्रामस्थांना ठार केले, अनेकांना कायमचे अपंग केले, शाळांवर हल्ले करून ८-९ वर्षांच्या मुलांना पळवून नेले, या मुलांना हिंसाचार करण्यास भाग पाडले, अशा नक्षलवाद्यांच्या कारवाया सरकारने शांतपणे सहन कराव्यात, अशी काही लोकांची अपेक्षा होती. मात्र मोदी सरकारला नक्षलवाद्यांचा हिंसाचार कधीच मान्य नव्हता. हिंसाचार करणाऱ्यांचा कायमचा बंदोबस्त करणे हाच एकमेव मार्ग आहे. माओवाद्यांच्या पाठिमागे उभ्या राहिलेल्या शहरी नक्षलवाद्यांनी गेल्या काही दिवसात वेगवेगळ्या माध्यमातून हिंसाचार करणाऱ्या माओवाद्यांशी चर्चा करा, असे लेख लिहिले आहेत. ज्या-ज्या विचारवंतांनी हे लेख लिहिले आहेत त्यांची संपूर्ण यादी माझ्याकडे आहे. नक्षलवादी अन्यायाविरोधात लढतात म्हणून त्यांना ठार करू नका, असा युक्तिवाद हे विचारवंत करतात. मात्र नक्षलवाद्यांनी बळजबरीने पळवून नेलेल्या




८-९ वर्षाच्या मुलांबाबत मात्र हे विचारवंत एक ओळही लिहित नाहीत. शेतांमध्ये बॉम्ब, सुरंग ठेवून अनेक शेतकऱ्यांना अपंग करणाऱ्या नक्षलवाद्यांचा निषेध करणारी एकही ओळ हे विचारवंत लिहित नाहीत. या विचारवंतांचे मानवता प्रेम हिंसाचार करणाऱ्या नक्षलवाद्यांपुरते मर्यादीत आहेत. हे नक्षलवादी हिंसाचार करून अनेक सामान्य नागरिकांना ठार करतात तेव्हा या विचारवंतांचा मानवतावाद कुठे गायब होतो, हेच कळत नाही. काँग्रेससारख्या देशावर अनेक वर्षे राज्य करणाऱ्या पक्षाचे नेतेही नक्षलवाद्यांचे समर्थन करतात, यासारखी दुर्देवाची गोष्ट नाही. नक्षलवाद्यांना पाठिंबा देणारे सुदर्शन रेड्डी हे उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत विरोधकांचे उमेदवार होते. यावरूनच काँग्रेससह अनेक विरोधी पक्षांचा नक्षलवादी शक्तींना पाठिंबाच आहे, हे सिद्ध झाले आहे. मानवतेचा कळवळा येणारे विचारवंत नक्षलवाद्यांचे वेगवेगळ्या व्यासपीठांवरून खुलेपणाने समर्थन करतात. या ढोंगीपणामुळेच अनेक वर्षे नक्षलवाद्यांविरोधात व्यापक आणि नियोजनबद्ध कारवाई होऊ शकली नाही. मोदी सरकार २०१४ मध्ये सत्तेवर आल्यानंतर दहशतवाद आणि हिंसाचाराविरोधात कडक भूमिका स्वीकारली गेली. या कणखर भूमिकेमुळेच आज आपला देश नक्षलमुक्त झाला आहे, हे मी अभिमानाने सांगू इच्छितो. ब्रिटिशांविरूद्ध स्वातंत्र्यासाठी लढत असताना देशातील आदिवासी, वनवासी जनतेने बिरसा मुंडा, तिलका मांझी, राणी दुर्गावती, मुर्मू बंधू यांना आपले दैवत मानले होते.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर नक्षलवाद्यांच्या खोट्या प्रचारामुळे आदिवासी जनता माओला देव मानू लागली. हे परिर्वतन एकाएकी झाले नव्हते. डाव्या पक्षांच्या विचारधारेतून हे परिर्वतन झाले होते. त्यातूनच देशाचा मोठा भाग नक्षलग्रस्त बनला. नक्षलवाद्यांच्या हिंसाचारात अनेक राज्यांच्या पोलीस कर्मचाऱ्यांना, अधिकाऱ्यांना आपले प्राण गमवावे लागले. केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या अनेक कर्मचाऱ्यांनाही आपले प्राण गमवावे लागले. या पोलीस कर्मचाऱ्यांच्या, अधिकाऱ्यांच्या हत्या करणाऱ्यांना मोदी सरकार कधीच माफ करणार नाही. त्यामुळेच मोदी सरकारने गेल्या १२ वर्षात नक्षलवादाचे निर्मूलन करण्यासाठी कठोर भूमिका घेतली. या कठोर भूमिकेला यश मिळू लागले आहे. ■

## नक्षलवाद्यांना त्यांच्याच भाषेत उत्तर दिले

■ बस्तरचा भाग अनेक वर्षे नक्षलवाद्यांच्या दहशतीमुळे विकासापासून वंचित राहिला. ही दहशत आता संपल्यामुळे बस्तर भागाचा वेगाने विकास होत आहे.

■ दहशतवाद्यांना त्यांच्यात भाषेत उत्तर देण्याचे मोदी सरकारचे धोरण आहे.

■ गरिबीमुळे नक्षलवाद निर्माण झाला, असे म्हणणे खोटे आहे. उलट नक्षलवाद्यांमुळे या भागात विकास न पोहचल्यामुळे गरिबीचे साम्राज्य तयार झाले.

■ मोदी सरकारच्या वेगवेगळ्या योजनांमुळे नक्षलवाद्यांचा प्रभाव असलेल्या भागातील जनतेची गरीबी संपुष्टात येऊ लागली आहे.

■ मोदी सरकार कोणत्याच दहशतवाद्यांना, हिंसाचार करणाऱ्यांना घाबरत नाही.

■ कोणावरही अन्याय होऊ न देण्याचे आणि सर्वांना न्याय देण्याचे मोदी सरकारचे धोरण आहे.

■ अन्याय झाला म्हणून त्याविरोधात हातात शस्त्र घेणे हे लोकशाही आणि संविधानाच्या विरोधात आहे.

■ आपल्या संविधानामध्ये अन्यायविरुद्ध दाद मागण्याची आणि न्याय मिळवण्याची व्यवस्था आहे.

■ मोदी सरकारच्या धोरणामुळे नक्षलग्रस्त भागात शिक्षण, आरोग्य या प्राथमिक सुविधांबरोबरच रस्ते, वीज यासारख्या पायाभूत सुविधाही उपलब्ध होऊ लागल्या आहेत.



(केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या भाषणातील ठळक मुद्दे)

## नक्षलग्रस्त भागात आता कायदा आणि संविधानाचे राज्य

■ यापूर्वी जेव्हा-जेव्हा बस्तरचे नाव घेतले जात असे, त्यावेळी तेथील हिंसाचाराचीच प्रतिमा डोळ्यासमोर उभी राहत असे.

■ नक्षलवाद्यांचा बंदोबस्त केल्यामुळे बस्तरसारख्या भागात विकासाची गंगा पोहचली आहे.

■ नक्षलवाद्यांच्या दहशतीतून बाहेर पडलेल्या बस्तरसारख्या भागातील नागरिकांचा आत्मविश्वास वाढू लागला आहे.

■ भारतातून नक्षलवादी आणि माओवाद्यांचा हिंसाचार संपूर्णपणे संपवला जाईल, ही मोदी सरकारची गॅरंटी आहे.

■ नक्षलवाद्यांच्या हिंसाचारामुळे देशातील मोठा भाग 'रेड कॉरिडॉर' म्हणून ओळखला जात असे. आता विविध सरकारी योजना पोहचल्यामुळे हा भाग विकासाचा 'ग्रीन कॉरिडॉर' बनू लागला आहे.

■ हिंसाचार करणाऱ्यांना, दहशतवाद्यांना दया-माया न दाखवता त्याच पद्धतीने उत्तर देणे ही नव्या भारताची ओळख बनली आहे.

■ नक्षलवाद्यांच्या हिंसाचारामुळे रक्ताने माखलेल्या भागामध्ये आता संविधान आणि कायद्याचे राज्य प्रस्थापित झाले आहे.

■ नक्षलग्रस्त भागात आता तिरंगा मोठ्या अभिमानाने फडकवला जात आहे.

■ नक्षलवाद्यांच्या हिंसाचारामुळे या भागातील युवकांवर मोठा अन्याय झाला.

■ गेल्या काही वर्षात हजारो नक्षलवाद्यांनी शस्त्रे खाली ठेऊन आत्मसमर्पण केले आहे.

■ आत्मसमर्पण करणारे नक्षलवादी आता देशाच्या मुख्य प्रवाहात सहभागी झाले आहेत.



(पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नक्षलवाद्यांसंदर्भात केलेल्या वक्तव्यांचे संकलन)

# गरिबीमुळे नक्षलवाद पसरला हा गैरसमज




● **अमित शाह**, केंद्रीय गृहमंत्री

> नक्षलवाद हा गरिबीमुळे पसरला नाही; उलट, नक्षलवादामुळेच अनेक राज्यांमध्ये अनेक वर्षे गरिबी कायम राहिली. नक्षलवादाची मुळे ही गरिबी आणि विकासाचा अभाव यांच्याशी जोडलेली नसून, ती पूर्णपणे वैचारिक आहेत. नक्षलबारीमध्ये साक्षरतेचे प्रमाण ३२%, बस्तरमध्ये २३%, बिहारमधील सहर्सा येथे ३३% आणि उत्तर प्रदेशातील बलिया येथे ३१% होते.

**त्याचप्रमाणे,** नक्षलबारीमध्ये दरडोई उत्पन्न ५०० रुपये, बस्तरमध्ये १९० रुपये, सहर्सा येथे २९९ रुपये आणि बलिया येथे ३७४ रुपये होते. या चारही प्रदेशांमधील दरडोई उत्पन्न साधारणपणे सारखेच होते; तरीही नक्षलबारी आणि बस्तरमध्ये डाव्या विचारसरणीचा अतिरेक फोफावला, मात्र सहर्सा आणि बलियामध्ये तसे घडले नाही. याचे कारण असे की, सहर्सा आणि बलिया येथील भौगोलिक रचना त्यांच्यासाठी अनुकूल नव्हती. तिथे लपण्यासाठी दाट जंगले, नद्या–नाले किंवा टेकड्या उपलब्ध नव्हत्या. शस्त्रे बाळगण्यासाठी, आपल्या हालचाली पार पाडण्यासाठी, आदिवासींना दडपण्यासाठी किंवा त्यांना बळजबरीने आपल्या विचारसरणीशी जोडण्यासाठी तिथे कोणतीही अनुकूल परिस्थिती नव्हती. त्यांनी म्हटले की, जर विकास हा निकष असता, जर दरडोई उत्पन्न हा निकष असता, तर देशाचे असे अनेक भाग होते जिथे १९७० च्या दशकात विकास पोहोचलाच नव्हता; मग तिथे नक्षलवाद का पसरला नाही?

नक्षलवादी चळवळीची सुरुवात १९७० च्या दशकात नक्षलबारी आणि बंगालमधून झाली. केवळ १९७१ या एकाच वर्षात, तिथे हिंसेच्या ३,६२० घटना घडल्या होत्या. १९८० च्या दशकापर्यंत 'पीपल्स वॉर ग्रुप'ची स्थापना झाली आणि ही चळवळ महाराष्ट्र, मध्य प्रदेश व ओडिशा या राज्यांमध्ये पसरली. १९९० च्या दशकात डाव्या विचारसरणीचा प्रभाव ओसरू लागला आणि अतिरेकी गट व डाव्या विचारसरणीचे पक्ष यांच्यात विलीनीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. २००४ मध्ये, दोन



प्रमुख गटांचे विलीनीकरण होऊन 'सीपीआय (माओवादी)' या संघटनेची निर्मिती झाली. १९७० ते २००४ या कालावधीत– केवळ चार वर्षे वगळता– उर्वरित संपूर्ण काळ हा मुख्य विरोधी पक्षाच्या सत्तेखाली होता.

हा तो काळ होता जेव्हा नक्षलबारीपासून सुरू झालेले आंदोलन १२ राज्यांमध्ये पसरले होते; या आंदोलनाने देशाच्या एकूण भूभागापैकी १७ टक्के भाग आणि १० टक्क्यांहून अधिक लोकसंख्या व्यापली होती. सत्तेवर असलेल्यांच्या पाठिंब्याशिवाय, देशाच्या अगदी मध्यभागी –तिरुपतीपासून पशुपतिनाथापर्यंत विस्तारलेला – 'रेड कॉरिडॉर' (लाल पट्टा) निर्माण करणे अशक्यच होते. जप्त करण्यात आलेल्या शस्त्रांपैकी ९२ टक्के शस्त्रे पोलिसांकडून लुटलेली होती.

पोलीस ठाणी आणि काडतुसे लुटली गेली आणि त्यांचा वापर निरपराध जवान, मुले व शेतकऱ्यांची हत्या करण्यासाठी केला गेला. डाव्या विचारसरणीने प्रचाराच्या माध्यमातून या गोष्टीचे प्रचंड उदात्तीकरण केले. आपली विचारसरणी टिकवून ठेवण्याच्या उद्देशाने, अन्यायाविरुद्ध लढण्यासाठीच हाती शस्त्रे घेतली जात आहेत, असा एक खोटा वृत्तांत त्यांनी पद्धतशीरपणे पसरवला.

२० ऑगस्ट २०१९ रोजी गृह मंत्रालयात एक बैठक आयोजित करण्यात आली होती; ज्यामध्ये संपूर्ण पोलीस समन्वय, आधुनिकीकरण, आत्मसमर्पण केलेल्या नक्षलवाद्यांचा पोलीस दलात समावेश आणि त्यांचा गुप्तचर संस्थांशी समन्वय – या सर्व बाबींची आखणी करण्यात आली होती. त्यावेळी छत्तीसगडमध्ये विरोधी पक्षाचे (काँग्रेसचे) सरकार होते, ज्यांनी सहकार्य केले नाही. बिहार राज्य २४ ऑगस्ट २०२४ पूर्वीच नक्षलमुक्त झाले होते.

महाराष्ट्र राज्यही २४ ऑगस्ट २०२४ पूर्वीच नक्षलमुक्त झाले होते, केवळ एक तालुका वगळता. २०२४ पूर्वीच ओडिशा नक्षलमुक्त झाला होता. झारखंडही, केवळ एक जिल्हा वगळता, २०२४ पूर्वीच नक्षलमुक्त झाला होता. केवळ छत्तीसगड बाकी होते; कारण तेथील विरोधी पक्षाचे सरकार नक्षलवाद्यांना संरक्षण देत होते. जानेवारी २०२४ मध्ये छत्तीसगडमध्ये सरकार स्थापन झाले आणि अगदी दुसऱ्याच दिवसापासून मोदी सरकारला पूर्ण पाठिंबा व आश्वासन मिळाले. एक संयुक्त रणनीती तयार करण्यात आली आणि २४ ऑगस्ट २०२४ रोजी मोदी साकारणे अशी घोषणा केली की, ३१ मार्च २०२६ पर्यंत संपूर्ण देशातून नक्षलवादाचे पूर्णपणे उच्चाटन केले जाईल. त्यानंतर सुरक्षा जाळे अधिक बळकट केले गेले.

**(केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी संसदेत केलेल्या भाषणाचा अनुवाद.)**

# महिला सक्षमीकरणाचे स्वप्न साकार होणार

## संसद, विधिमंडळात महिलांना आरक्षण मिळणार



'नारी शक्ती वंदन अधिनियम हा देशातील लोकसभा, राज्य विधानसभा आणि दिल्ली विधानसभेत महिलांसाठी ३३ टक्के म्हणजेच एक-तृतीयांश जागा राखीव ठेवणारा एक ऐतिहासिक घटनादुरुस्ती कायदा आहे. सप्टेंबर २०२३ मध्ये संसदेने मंजूर केलेल्या कायद्यानुसार त्यात अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या जागांचाही समावेश असेल. यामुळे महिलांचा राजकारणातील सहभाग आणि प्रतिनिधित्व वाढेल. हा केवळ भारतीय महिलांसाठीच नव्हे, तर संपूर्ण भारतासाठी एक ऐतिहासिक टप्पा आहे.

**मा. पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजपा सरकारने आणलेल्या नारी शक्ती वंदन अधिनियम संदर्भात भाजपातर्फे देशव्यापी जनसंपर्क अभियान राबवण्यात येणार आहे. त्या अंतर्गत १५ आणि १६ एप्रिल रोजी प्रत्येक लोकसभा क्षेत्रात पदयात्रांसह अनेक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहेत. यात अधिकाधिक महिलांनी सहभागी होऊन हे अभियान एक जनआंदोलन व्हावे, असा भाजपाचा प्रयत्न आहे.

जागतिक संशोधनातून असे दिसून येते की, अधिक महिला कार्यक्षेत्रात सामील होतात तेव्हा अर्थव्यवस्था वेगाने वाढते. ते उत्पन्न समानता आणि सर्वसमावेशक विकासाला प्रोत्साहन देते. लिंगभेद कमी झाला तर जागतिक अर्थव्यवस्था अंदाजे ७ ट्रिलियन डॉलर्सने वाढू शकते. गेल्या दशकात भारतात अनेक महत्त्वाचे बदल झाले आहेत. ७२ टक्के घरे महिलांच्या नावावर आहेत. पदवीधरांमध्ये ४३ टक्के महिला आहेत. मुद्रा योजनेअंतर्गत मिळणाऱ्या कर्जांपैकी ६९ टक्के कर्ज महिलांना दिले गेले आहे. स्टँड-अप इंडियाच्या लाभार्थ्यांपैकी ८४ टक्के महिला आहेत. उज्ज्वला योजना (१० कोटी एलपीजी



जोडण्या) जल जीवन मिशन (१४.४५ कोटी घरांना पाणीपुरवठा) स्वच्छ भारत अभियान (उघड्यावर नैसर्गिक विधी करण्यापासून मुक्ती) या शासकीय योजनांनी महिलांचे जीवनमान सुधारले आहे. आर्थिक आणि आरोग्यविषयक सक्षमीकरणात महिला सन्मान बचत प्रमाणपत्र, माता मृत्यूदरात घट, २६ आठवड्यांची प्रसूती रजेचा समावेश आहे.

त्यानंतर आता लोकसभेत महिलांची संख्या वाढवणे, पंचायतींमध्ये ४६ टक्के महिलांचे प्रतिनिधित्व हा राजकीय सहभाग अपेक्षित आहे. आज देशातील प्रत्येक निवडणुकीत महिला मोठ्या संख्येने मतदान केंद्रांवर रांगा लावून मतदान करताना दिसतात. अलीकडील निवडणुकांमध्ये अनेक ठिकाणी मतदान करणाऱ्या महिलांची संख्या पुरुषांपेक्षाही जास्त झाली आहे. हा महत्त्वपूर्ण बदल हे दर्शवतो की महिला आता लोकशाहीच्या परिघावर नाहीत तर त्या थेट तिच्या केंद्रस्थानी आहेत.

२०२४ मध्ये ६५.७८ टक्के महिलांनी मतदान केले, जे पुरुषांपेक्षा किंचित जास्त आहे. यावरून असे दिसून येते की महिला लोकशाहीत अधिक सक्रिय होत आहेत. पण जेव्हा आपण संसद आणि राज्य विधानसभांकडे पाहतो तेव्हा तिथे महिलांची संख्या कमीच राहते. लोकसभेत १९५२ साली २२ महिला होत्या, ही संख्या २०२४ मध्ये ७५ पर्यंत वाढली आहे. राज्यसभेतही महिलांचा सहभाग सुमारे १७ टक्के आहे. ही एक प्रगती असली तरीही ती आदर्श स्थितीपासून खूप दूर आहे.

ग्रामीण भागामध्ये आपण पाहिले आहे की महिलांना संधी दिली जाते, तेव्हा त्या चांगली कामगिरी करतात. आज, पंचायती राज संस्थांमध्ये अंदाजे १४.५ लाख महिला निवडून आल्या आहेत. ते एकूण प्रमाण प्रतिनिधींच्या सुमारे ४६ टक्के आहे. या गावांमध्ये सुधारित पाणीपुरवठा, शाळांचे नूतनीकरण आणि स्वच्छता, पोषण व आरोग्याकडे वाढलेले लक्ष, असे छोटे पण महत्त्वपूर्ण बदल घडून येत आहेत. या बदलांमुळे लोकांचे दैनंदिन जीवन सुधारते. यावरून हे दिसते की महिलांना संधी मिळते तेव्हा त्या केवळ पदेच भूषवत नाहीत तर प्रशासनही बळकट करतात. काहीजण विचारू शकतात की, महिलांचा सहभाग आधीच वाढत असताना या कायद्याची गरज का आहे. याचे उत्तर असे आहे की, सहभाग आणि प्रतिनिधित्व नेहमीच एकत्र येत नाहीत. त्यामुळे कधीकधी धोरणांच्या माध्यमातून संतुलन साधणे आवश्यक असते.

आजच्या महिला केवळ मतदार नाहीत. त्या विद्यार्थिनी, व्यावसायिक, उद्योजिका आणि अधिकारीही आहेत. त्या प्रत्येक क्षेत्रात योगदान देत आहेत, त्यामुळे शासनामध्ये त्यांचा सहभाग अत्यावश्यक आहे. हा बदल अंमलात आणायला वेळ आणि नियोजन लागेल, पण दिशा योग्य असली पाहिजे. शेवटी, लोकशाही म्हणजे केवळ मतदानाचा हक्क नव्हे, तर सरकारमध्ये लोकांना आपले प्रतिनिधित्व दिसणे हेही आहे. जेव्हा लोकांना आपला



आवाज ऐकला जात आहे असे वाटते, तेव्हा लोकशाही अधिक मजबूत होते.

या कायद्याच्या अंमलबजावणीचा सर्वात महत्त्वाचा फायदा म्हणजे प्रशासकीय प्राधान्यक्रमांमध्ये एक मोठा बदल घडून येईल. निर्णयप्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढल्यामुळे शिक्षण, आरोग्य, पोषण, सुरक्षा, पाणी आणि स्वच्छता यांसारख्या विषयांना अधिक प्राधान्य प्राप्त होते. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिला आरक्षणाच्या अनुभवाने हे आधीच सिद्ध झाले आहे की, महिलांच्या प्रतिनिधित्वामुळे धोरणे अधिक लोककेंद्रित आणि प्रभावी बनतात. हाच परिणाम आता संसद आणि राज्य विधानमंडळांच्या स्तरावरही दिसून येईल. परिणामी अधिक संतुलित आणि सर्वसमावेशक विकासाला चालना मिळेल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली महिला सक्षमीकरणाकडे व्यापक आणि जीवनचक्र दृष्टिकोनातून पाहिले गेले आहे. 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' अभियानाने सामाजिक विचारांमध्ये सकारात्मक बदल घडवला आहे आणि मुलींच्या माध्यमिक शिक्षणाचा दर ८०.२ टक्क्यांवर पोहोचला आहे. सुकन्या समृद्धी योजनेअंतर्गत ४६ दशलक्षांहून अधिक खाती उघडण्यात आल्याने मुलींच्या भविष्याला आर्थिक सुरक्षा मिळाली आहे. उच्च शिक्षण आणि तांत्रिक क्षेत्रांमध्ये महिलांच्या सहभागात होणारी सातत्यपूर्ण वाढ हा बदल स्पष्टपणे दर्शवते.

आरोग्य आणि पोषण या क्षेत्रांमध्येही लक्षणीय प्रगती झाली आहे. प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेअंतर्गत ४२.७ दशलक्षाहून अधिक महिलांना पोषण सहाय्य मिळाले आहे. पोषण २.० अंतर्गत, १.४ दशलक्षाहून अधिक अंगणवाडी केंद्रांमार्फत ८९.७ दशलक्ष लाभार्थ्यांपर्यंत सेवा पोहोचत आहेत. या प्रयत्नांची अंमलबजावणी केली जात आहे. याचा परिणाम म्हणून मातामृत्यू दरात लक्षणीय घट झाली आहे, जे महिलांच्या आरोग्याच्या क्षेत्रातील सकारात्मक बदल दर्शवते.

आर्थिक सक्षमीकरण हे या परिवर्तनाचा एक प्रमुख आधारस्तंभ बनले आहे. प्रधानमंत्री जन धन योजनेअंतर्गत ३२.२९ कोटी महिला बँकिंग प्रणालीमध्ये सामील झाल्याने आर्थिक समावेशनाला नवी चालना मिळाली आहे. महिलांना मुद्रा योजनेअंतर्गत ६८ टक्के कर्ज मिळाले आहे, तर १० कोटींहून अधिक महिला स्वयं-सहायता गटांच्या माध्यमातून स्वतःला संघटित करून आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करत आहेत. लखपती दीदी आणि नमो ड्रोन दीदी यांसारख्या उपक्रमांनी महिलांना त्यांच्या पारंपरिक भूमिकांच्या पलीकडे जाऊन तंत्रज्ञान आणि उद्योजकतेमध्ये सक्षम केले आहे. या साऱ्या पार्श्वभूमीवर नारी शक्ती वंदन अधिनियम केवळ एक घटनात्मक तरतूद नसून २०४७ पर्यंत विकसित भारताच्या निर्मितीच्या वचनबद्धतेला गती देण्याच्या दिशेने टाकलेले एक निर्णायक पाऊल आहे. महिला नेतृत्वपदावर येतात तेव्हा विकासप्रक्रिया अधिक सर्वसमावेशक आणि संतुलित बनते. नारी शक्ती वंदन अधिनियमाची अंमलबजावणी हा ती दूरदृष्टी साकार करण्याच्या दिशेने एक ऐतिहासिक उपक्रम आहे. आगामी काळात तो भारताची लोकशाही आणि विकास प्रारूप अधिक मजबूत करेल. ■

# विचारधारेशी एकनिष्ठता हीच भाजपची ताकद !

● **रविंद्र चव्हाण**, प्रदेशाध्यक्ष


> भाजपला स्थापनेपासूनच शेटजी-भटजींचा पक्ष म्हणून हिणवले गेले, मात्र तो राज्यात जाती-पातीचे राजकारण करणाऱ्या काँग्रेससह सर्वच विरोधी पक्षांच्या नॅरेटिव्हचाच भाग होता. अति उजवा पक्ष म्हणूनही संबोधले गेले, पण आपल्या देशाविषयी पराकोटीचा जाज्वल्य अभिमान हा जर अवगुण असेल तर त्या अवगुणात कायमस्वरूपी राहण्यास आम्ही तयार आहोत. कारण राष्ट्र प्रथम हाच आमच्या पक्ष तत्त्वज्ञानाचा गाभा आहे.

**विचारधारेच्या** घट्ट मुळांनी मातीत खोलवर रुजलेला आणि कार्यकर्त्यांच्या संघर्षातून उभा राहिलेला भारतीय जनता पक्षाचा वटवृक्ष ४७ व्या वर्षात पदार्पण करत आहे. ६ एप्रिल १९८० रोजी पेरलेले हे बीज आज जवळपास २५ कोटींहून अधिक कार्यकर्त्यांच्या घामातून देशभर विस्तारले आहे. भारतीय जनता पक्षाचा कार्यकर्ता, भाजयुमोचा उपाध्यक्ष, नगरसेवक, आमदार, कॅबिनेट मंत्री आणि आता प्रदेशाध्यक्ष या नात्याने जेव्हा मी पक्षाच्या इतिहासाकडे पाहतो, तेव्हा मला जाणवते की जसे विचारधारेने एक-एक कार्यकर्ते घडवले आणि त्याचप्रमाणे असंख्य ध्येयवादी कार्यकर्त्यांनी त्यांच्या रक्ता-घामाने गुरुदक्षिणा म्हणून पक्षाला घडवले. नाही तर नेहरू-गांधींची अल्पसंख्याककेंद्रित समाजवादी पद्धती, साम्यवादी चळवळ यांचा आंतरराष्ट्रीय बोलबाला असताना ७५ वर्षांपूर्वी जनसंघाच्या माध्यमातून बहुसंख्य पण पिचलेल्या शोषित समाजाला केंद्रस्थानी ठेवण्याची आणि तरीही प्रवाहाविरुद्ध पोहण्याची जिद्द परमश्रध्देय श्यामाप्रसाद मुखर्जी, दीनदयाळ उपाध्याय, अटलजी यांनी दाखवली, हे फार दूरदर्शी होते. म्हणूनच आमच्यासारख्या कार्यकर्त्यांसाठी विचारधारेचे आणि पक्षाचे संस्थापक दीपस्तंभासारखे दिशादर्शक आहेत.

वैचारिक पाया आणि नेतृत्वाची परंपरा लाभलेल्या भाजपच्या या प्रवासात अनेक ऋषितुल्य नेत्यांचे योगदान आहे. महाराष्ट्र भाजपचाच विचार करायचा झाला तर १९८० मध्ये उत्तमराव पाटील यांनी पहिले प्रदेशाध्यक्ष म्हणून पक्षाचा पाया रचला. खानदेशच्या या सुपुत्राने आपल्या प्रभावी वक्तृत्वाने महाराष्ट्र पिंजून काढला. त्यानंतर गोपीनाथराव मुंडे यांनी पक्षाला खऱ्या अर्थाने 'गावकुसाबाहेर' नेले. बहुजन आणि ओबीसी समाजाला मुख्य प्रवाहात आणून अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी सज्ज केले. राजकारणाचे गुन्हेगारीकरण या मुद्द्यावर त्यांनी अक्षरशः महाराष्ट्र पेटवला आणि १९९५ मध्ये काँग्रेसची राजवट उलथून टाकली. प्रा. ना. स. फरांदे यांच्यासारख्या नेत्याने पक्षाला वैचारिक अधिष्ठान दिले, तर सूर्यभान वहाडणे पाटील यांनी अत्यंत संयमी आणि शिस्तबद्ध नेतृत्वाने संघटनेला बळकटी दिली.

विदर्भाच्या मातीतील भाऊसाहेब फुंडकर यांनी भाजपला वावरातल्या बांधावर नेले. शेतकऱ्यांसाठी आयुष्यभर त्यांनी संघर्ष केला. नितीन गडकरी यांनी प्रमोद महाजन यांच्या आकस्मिक निधनानंतर भाजप कार्यकर्त्यांना आधाराचा हात दिला आणि कार्यकर्त्यांची मोट बांधून ठेवली. सुधीर मुनगंटीवार यांनी जनसंपर्काचा नवा अध्याय सुरू केला. २०१३ मध्ये देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात पक्षाने मोठी झेप घेतली आणि प्रदेशाध्यक्षपदावरून थेट राज्याचे मुख्यमंत्री होण्याचा अनोखा विक्रम त्यांनी प्रस्थापित केला. पुढे रावसाहेब दानवे, चंद्रकांतदादा

**राम मंदिराची उभारणी करून आणि तीन तलाक प्रथा रद्द करून भाजपाने आपली वैचारिक एकनिष्ठता सिद्ध केली आहे.**





पाटील आणि चंद्रशेखर बावनकुळे या अनुभवी नेत्यांनी पक्ष आणि सरकारमध्ये उत्तम समन्वय राखून भाजपला तळागाळातील शेवटच्या माणसापर्यंत पोहोचवले.

ज्या भारतीय जनता पक्षाला, शेटजी-भटजींचा पक्ष असे पक्ष स्थापनेपासून हिणवले जात होते, फुले, शाहू, आंबेडकर यांचे नाव घेऊन राज्यात जाती-पातीचे राजकारण करणाऱ्या काँग्रेससह सर्वच विरोधी पक्षांच्या नॅरेटिव्हचाच हा एक भाग होता. त्याच भाजपने ४६ वर्षांत महाराष्ट्रामध्ये तब्बल ११ प्रदेशाध्यक्ष बहुजन समाजातून दिले हे जातीचे राजकारण करणाऱ्या सर्वच राजकीय पक्षांना दिलेले खणखणीत उत्तर आहे.

आज एक कार्यकर्ता म्हणून प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळताना मला अभिमान वाटतो की, सामान्य कार्यकर्ता ते थेट प्रदेशाध्यक्ष ही झेप केवळ भाजपमध्येच शक्य आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मिळवलेले यश हे भाजपसाठी केवळ आकड्यांचा खेळ नसून ती जनतेच्या मनातील आमच्या पक्षाविषयीची विश्वासार्हता आहे. भारतीय जनता पक्षाची संघटना केवळ बॅनर आणि सभांपुरती कधीच मर्यादित नव्हती. विचारधारेशी एकनिष्ठ कार्यकर्ते हीच पक्षाची ताकद आहे. त्यामुळेच भारतीयत्व हेच राष्ट्रीयत्व हा विचार आम्ही तळागाळातील लोकांपर्यंत नेऊ शकलो. आम्हाला अनेकदा अति उजवे (हायपर नॅशनॅलिस्ट) असे संबोधण्यात येते. आपल्या देशाविषयी परकोटीचा जाज्वल्य अभिमान हा जर अवगुण असेल तर त्या अवगुणात कायमस्वरूपी राहण्यास आम्ही तयार आहोत. कारण राष्ट्र प्रथम हाच आमच्या पक्ष तत्त्वज्ञानाचा गाभा आहे. असे असले तरी आजूबाजूला होणारे नैसर्गिक, राजकीय, भौगोलिक, तंत्रज्ञानातील बदल स्वीकारून आमचा पक्ष मार्गक्रमण करत आलेला आहे. त्यामुळेच आम्ही भाजपला एक 'तंत्रस्नेही' संघटना बनवत आहोत. प्रत्येक बूथवरील कार्यकर्त्याशी सदैव (रिअल-टाइम) संपर्कात राहता येणे आम्हाला पक्ष म्हणून शक्य असते. कारण हा भाजपचा संघटन कारभाराचा भाग आहे.

ज्याप्रमाणे विकासाचा वेग म्हणजे रस्ते, तसेच अन्य दळणवळणाची, संपर्काची साधने (कनेक्टिव्हिटी) जास्तीत जास्त असणे महत्त्वाचे, त्याच अनुषंगाने कार्यकर्त्याने जनतेशी आणि पदाधिकाऱ्यांनी कार्यकर्त्यांशी सदैव संपर्कात राहणे हा आमच्या पक्षशिस्तीचा भाग आहे. केंद्रातील मोदीजींचे सरकार आणि राज्यातील देवाभाऊंचे सरकार यांच्या योजना, सरकार करत असलेली विकासकामे जनतेपर्यंत सातत्याने पोहोचवणे गरजेचे आहे, भारताला पाच ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था होण्याच्या प्रवासात महाराष्ट्राचा एक ट्रिलियन डॉलरचा वाटा सुनिश्चित करण्यावर शासनाचा भर आहे. या सर्व योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी भाजपचा प्रत्येक कार्यकर्ता हा सक्षमपणे काम करेल याची मला खात्री आहे. त्याचबरोबर गावपातळीवर निर्माण होणाऱ्या समस्या सरकारपर्यंत पोहोचवणे हे भाजपच्या प्रत्येक कार्यकर्त्याचे काम आहे. कारण हाच तर खरा 'अंत्योदय' तत्त्वाचा विचार आहे. महाराष्ट्र प्रदेश भाजपचे ते कर्तव्य आहे. कारण आमचा कार्यकर्ता निष्ठेने काम करेल तेव्हा विकसित भारताचे स्वप्न साकार होईल. विकसित महाराष्ट्राशिवाय हे शक्य नाही हेही तितकेच खरे.

**('दै.लोकसत्ता'मध्ये प्रसिद्ध झालेला लेख.)**

# २०२९ मध्ये संपूर्ण यशाचा संकल्प पूर्ण करायचा आहे

देशात आणि महाराष्ट्रात जनतेमध्ये भारतीय जनता पक्षाविषयी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी आणि पक्षाच्या विचारधारेविषयी विश्वासाचे, सकारात्मक वातावरण आहे. या वातावरणाचा योग्य वापर करून घेण्यासाठी कालबद्ध रीतीने कार्यक्रम आखून २०२९ चा संपूर्ण यशाचा संकल्प पूर्ण करण्यासाठी काम करावे, आणि देशभक्ती, राष्ट्रीयत्व आणि विकासाची गंगा सर्वांपर्यंत पोहोचवावी, त्यासाठी सक्रिय कार्यकर्त्यांनी कामाला लागावे, असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी केले. पक्षाच्या ४६व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित सक्रिय कार्यकर्ता मेळाव्यात श्री. चव्हाण बोलत होते.




**विधानसभा** अध्यक्ष राहुल नार्वेकर, सांस्कृतिक मंत्री आशीष शेलार, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, प्रदेश उपाध्यक्ष व स्थापना दिन कार्यक्रमाचे संयोजक केशव उपाध्ये, प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक, प्रदेश सरचिटणीस आ. निरंजन डावखरे, सुनील राणे, आ. योगेश सागर, आ. तमिल सेल्वन, आ. पराग शाह, आ. प्रवीण दरेकर महापौर रितू तावडे, आ. प्रसाद लाड आदी यावेळी उपस्थित होते.

आपल्या मार्गदर्शनपर भाषणात प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांनी पक्षाच्या कार्यपद्धतीचा आणि आगामी कार्यक्रमाचा व्यापक आढावा घेतला. पक्षाच्या कार्यपद्धतीचा सकारात्मक परिणाम समाजावर कसा होईल याचा सर्वांगीण विचार पक्ष नेहमीच करत असतो. कार्यकर्त्यानेही तसाच विचार करावा, असेही ते म्हणाले. सेवा आणि समर्पण भावनेतून पक्षाचा कार्यकर्ता काम करत राहिला, त्यामुळेच माझ्यासारख्या कार्यकर्त्याला सेवेची संधी प्राप्त झाली. भाजपला अनेक निवडणुकांमध्ये मिळालेले यश प्रचंड आहे. महाराष्ट्रात राजकीयदृष्ट्या पोषक समीकरण तयार करून प्रत्येक बूथची जबाबदारी घेणाऱ्या कार्यकर्त्यांची

## सक्रीय कार्यकर्त्यांनी बूथची जबाबदारी घ्यावी

**आदरणीय देवेंद्रजींच्या वाढदिवसाला राबवण्यात आलेल्या 'महारक्तदान संकल्प' शिबिरामध्ये आपण सर्वाधिक रक्तदानाचा विश्वविक्रम करून दाखवला आहे, ही भाजपाच्या कार्यकर्त्यांची ताकद आहे. हीच ताकद लक्षात घेत प्रत्येक कार्यकर्त्याने आपला बूथ सर्वात मजबूत कसा होईल याकडे लक्ष द्यावे.**

**अलिकडच्या निवडणुकांमध्ये भाजपाला मिळलेले यश हे अत्यंत मोठे आहे. सर्व आघाड्यांवर महाराष्ट्र अव्वल होत चालला आहे. या सकारात्मक बाबीचा लाभ घेत सक्रिय कार्यकर्ता म्हणून आपण प्रत्येक बूथची जबाबदारी स्वीकारून बूथ मजबूत करण्याचे काम केले तर २०२९ साली आपल्याला जे अपेक्षित आहे त्या दिशेने आपण जाऊ शकतो. राज्यात एक लाख ६ हजार बूथ आहेत आणि भाजपाकडे अडीच लाख सक्रीय कार्यकर्ते आणि दीड कोटी सदस्य आहेत. त्यामुळे मायक्रोप्लॅनिंगने आपण यश सहजपणे पदरात पडू शकतो त्यासाठी आपली नक्की भूमिका काय आहे हे आपण सर्वांनी समजून घेतले पाहिजे, असे आवाहन रविंद्र चव्हाण यांनी यावेळी कार्यकर्त्यांना केले. येत्या काळात आपण फेक नरेटीव्हपासून सावध राहणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे डिजिटल माध्यमांवर पूर्ण ताकदीने काय होत आहे यावर लक्ष ठेऊन त्यावर कशाप्रकारे व्यक्त होता येईल, हेही पाहिले पाहिजे.**

फळी पुढच्या स्थापना दिनाआधी भक्कम करू या, असे आवाहनही त्यांनी केले.

आपली क्षमता, कार्यकर्त्यांच्या ताकद काय आहे, याची आपल्याला कल्पना आहे, त्यामुळे २०२९ ला जे अपेक्षित आहे, ते ध्येय यामुळे सोपे होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देश आणि देवेंद्रजींच्या नेतृत्वात महाराष्ट्र प्रगतीची वेगवान वाटचाल करत आहे. त्यांची भूमिका स्पष्ट आहे. कार्यकर्त्यांनी केवळ कागदावर किंवा कार्डावर पदाधिकारी म्हणून न राहता सतर्क राहून कार्यपद्धतीची शक्ती सक्रिय ठेवत आपली भूमिका ओळखून कामाला लागले पाहिजे, असे ते म्हणाले.

स्वातंत्र्यानंतरचे मोदी सरकार हे एकमेव सरकार असे आहे, जे जगाच्या पाठीवर कोठेही भारतावरील संकटात असेल त्याच्या मदतीसाठी ते धावून जाते. आता देशासमोर जेव्हा संकटे उभी राहतात, तेव्हा देश मदतीसाठी संयुक्त राष्ट्रसंघांकडे पाहात नाही, आता 'घुसेगा और मारेगा' ही मोदी सरकारची नीती आहे. कोविडकाळात जगात मोठी लसीकरण मोहीम भारताची होती. जगाच्या पाठीवरील ९२ देशांमध्ये भारतीय कोविड लस पाठवून संकटाशी सामूहिक संघर्ष करण्यासाठी मोदी सरकारने पुढाकार घेतला, व 'वसुधैव कुटुम्बकम' ही शिकवण सार्थ केली, असे प्रातिपादन मुंबई भाजपचे अध्यक्ष अमित साटम यांनी केले. आपण आता जगातील तिसरी सर्वात अर्थव्यवस्था होत आहोत. आपला पक्ष हा जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष आहे, आणि विश्वगुरूचे स्थान मिळेल अशा पक्षाचे आपण कार्यकर्ते आहोत ही अभिमानास्पद बाब आहे. हा कार्यकर्ता पदासाठी नव्हे, तर समाजाच्या सेवेसाठी काम करतो, असे ते म्हणाले.

काही राजकीय पक्ष रशियाची विचारसरणी मानतात, काही राजकीय पक्ष केवळ विरोधाच्या राजकारणासाठी निर्माण झाले. महाराष्ट्रात वाटेकरी पक्ष निर्माण होऊन भावकीच्या वाटणीचे राजकारण करू लागले. या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्ष हा वेगळा आणि राष्ट्रीय विचारसरणीतून राष्ट्रासनाठी समर्पित असलेला पक्ष आहे, ही आपल्यासाठी अभिमानास्पद बाब आहे. पक्षाचा सक्रिय कार्यकर्ता हा 'राष्ट्राय स्वाहा' या भावनेने काम करतो, प्रसंगी घरादारावर तुळशीपत्र ठेवून पक्षाच्या प्रतिकूल परिस्थितीत योद्धा म्हणून काम करणाऱ्या असंख्य कार्यकर्त्यांचा हा पक्ष आहे, याचा आम्हाला अभिमान आहे, अशा शब्दांत राज्याचे मंत्री आशीष शेलार यांनी भावना व्यक्त केल्या. छत्रपती शिवराय हे आमचे आदर्श आहेत, आणि छत्रपतींचा विचार हा आमचा संस्कार, आचार आहे. भारतीय जनता पक्ष हा मुंबईच्या मातीत जन्म झालेला पक्ष हे, जगभरात हिंदुत्वाचा डंका वाजविणारा आमचा पक्ष आहे, असे ते म्हणाले.

प्रदेश उपाध्यक्ष केशव उपाध्ये यांनी आपल्या भाषणात पक्षाच्या स्थापनाप्रसंगी माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी व्यक्त केलेल्या स्वप्नाचा अभिमानास्पद उल्लेख केला. या नेत्यांनी पाहिलेले स्वप्न आज पूर्ण झाले आहे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. आगामी काळात






पक्षाचा प्रत्येक कार्यकर्ता पक्षाचा विचार आणि संस्कार घेऊन पुढे जात राहील असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. पक्षाचे असंख्य सक्रिय कार्यकर्ते, नेते, मंत्री, आमदार, नगरसेवकांच्या उत्साही उपस्थितीत साजऱ्या झालेल्या या समारंभात प्रारंभी पक्षाच्या उभारणीसाठी समर्पित भावनेने काम करणारे माजी मंत्री जगन्नाथ पाटील, ज्येष्ठ नेते मधु चव्हाण, लद्धाराम नागवाणी, दिलीप हजारे, अरुण मोरसावाला, शरद चव्हाण, श्रीपाद मुसळे, अविनाश दलाल आदी ज्येष्ठ कार्यकर्त्यांना प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण व मुंबई भाजपचे अध्यक्ष अमित साटम यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. समारंभाच्या प्रारंभी पक्षाच्या वाटचालीचा आढावा घेणाऱ्या चित्रफितीद्वारे जनसंघ ते भाजपा या वाटचालीतील राष्ट्रसमर्पित कार्याचा पट प्रदर्शित करण्यात आला. ■





नवी दिल्ली येथे केंद्रीय कार्यालयातील कार्यक्रमाला राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबिन, राष्ट्रीय संघटन मंत्री बी.एल. संतोष, केंद्रीय आरोग्य मंत्री जे.पी.नड्डा, राष्ट्रीय सरचिटणीस खा. अरुण सिंह, दुष्यंत गौतम, राष्ट्रीय सहसंघटन मंत्री शिवप्रकाश, दिल्ली प्रदेशाध्यक्ष वीरेंद्र सचदेव आदी मान्यवर उपस्थित होते.







ज्येष्ठ नेते जगन्नाथ पाटील, मधु चव्हाण, ज्येष्ठ कार्यकर्ते अविनाश दलाल, शरद चव्हाण, श्रीपाद मुसळे, अरूण मोरसावाला, दिलीप हजारे यांचा सत्कार– उपस्थिती – प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, मुंबई अध्यक्ष आ. अमित साटम आदी.



धुळे– उपस्थिती– डॉ. सुभाष भामरे, गजानन अंपळकर, नाना करपे, ज्येष्ठ नेते हिरामण गवळी, मदनलाल मिश्रा, रवी बेलपाठक आदी.




जालना– उपस्थिती– आ. बबनराव लोणीकर, भास्करराव दानवे, महापौर वंदना मगरे, राजेश राऊत, स्थायी समिती सभापती अशोक पांगारकर, संगीता गोरंट्याल आदी.



कोल्हापूर– उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, खा.धनंजय महाडिक यांच्या उपस्थितीत ज्येष्ठ कार्यकर्ते राजाराम शिपुगडे, दिलीप मैत्राणी, मामा कोळवणकर, किशोरी स्वामी, प्रभावती इनामदार, ॲड. संपतराव पवार, भारती जोशी, प्रमोदिनी हर्डीकर, अशोक लोहार, ईश्वरा पाटील, सुलभा मुजुमदार, राजाराम परिट यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हाध्यक्ष विजय जाधव, महेश जाधव, नाथाजी पाटील, शौमिका महाडिक, महापौर रूपाराणी निकम, राहुल चिकोडे, विशाल शिराळे, मुरलीधर जाधव आदी.



ठाणे– माहिती व तंत्रज्ञान,सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, प्रदेश सरचिटणीस आ. निरंजन डावखरे, आ. संजय केळकर, हेमंत म्हात्रे यांच्या उपस्थितीत वीणा भाटीया, अनिल भदे यांच्यासह अनेक ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सन्मान करण्यात आला.



सातारा– उपस्थिती– सार्वजनिक बांधकाम मंत्री छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले, जिल्हाध्यक्ष आ. डॉ. अतुल भोसले, ज्येष्ठ कार्यकर्ते आफळे काका, माजी आमदार डॉ. दिलीप येळगावकर, नगरसेवक शंकर माळवदे, प्रभावती दरेकर, किशोर गोडबोले, स्थापना दिन अभियान प्रदेश सहसंयोजक विक्रम पावसकर, किसान मोर्चा प्रदेशाध्यक्ष रामकृष्ण वेताळ, सुनील काटकर, जि.प. अध्यक्षा प्रिया शिंदे, जि.प. उपाध्यक्ष राजूभैया भोसले, नगराध्यक्ष अमोल मोहिते, उपनगराध्यक्ष दत्तात्रय बनकर, जि. प. शिक्षण व अर्थ सभापती तेजस्विनी कदम आदी.



जळगाव- उपस्थिती- खा. स्मिता वाघ, आ. राजु भोळे, जिल्हाध्यक्ष दीपक सुर्यवंशी, माजी जिल्हाध्यक्ष चंद्रकांत बढे, ज्येष्ठ कार्यकर्ते बाबू पटेल, उदय भालेराव, विशाल त्रिपाठी, मंडल अध्यक्ष आनंद सपकाळे, मंडल सरचिटणीस राहूल सनकत, कोषाध्यक्ष शुभम विंचवेकर, उपाध्यक्ष तुषार सूर्यवंशी, भाजयुमो जिल्हाध्यक्ष महेश पाटील, महिला मोर्चा मंडल अध्यक्ष तारा पटेल, राजश्री सोनवणे आदी.



वर्धा- उपस्थिती- संजय गाते, जयंत कावळे, गिरीश कांबळे, जिल्हा उपाध्यक्षा अर्चना वानखेडे, जिल्हा सरचिटणीस अशोक कलोडे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष पृथ्वीराज शिंदे, महिला आघाडी जिल्हाध्यक्षा वैशाली येरावार, शहर अध्यक्ष निलेश किटे आदी.




बीड- उपस्थिती- जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, ॲड. सर्जेराव तांदळे, डॉ. योगेश क्षिरसागर, राम कुलकर्णी, ज्येष्ठ नेते माजी आ. आदिनाथ नवले-पाटील, पंजाब मस्के, विजयकुमार पालसिंगणकर, गजानन जगताप, ॲड. वाल्मिक निकाळजे, नवनाथ शिराळे, मीरा गांधले, शिवाजी मुंडे, अजय सवाई आदी.




पंढरपूर- सुरेश खिस्ते, काशिनाथ थिटे, प्रकाश कुलकर्णी, बाबा बडवे आदी ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा माऊली हळणवर आदींच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला.


# डॉ. बाबासाहेब आंबेडकर - द्रष्टे अर्थतज्ज्ञ

● मिलिंद कानडे (सीए)

स्वतंत्र भारताच्या निर्मितीच्या इतिहासात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव प्रामुख्याने सामाजिक न्यायाच्या लढ्याशी जोडले जाते. मात्र, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांचे आर्थिक विचार. आज भारत वेगाने प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत असताना, आर्थिक विषमता, बेरोजगारी, ग्रामीण-शहरी दरी आणि संसाधनांचे असमान वितरण यांसारख्या समस्या अधिक तीव्रतेने जाणवत आहेत. या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक तत्त्वज्ञान समजून घेणे, अधिकच प्रासंगिक ठरते.

**डॉ. आंबेडकरांनी** अर्थशास्त्राचा सखोल आणि वैज्ञानिक अभ्यास केला होता. कोलंबिया विद्यापीठ आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथे त्यांचे शिक्षण झालेले असल्यामुळे त्यांना जागतिक आर्थिक प्रणालींचे व्यापक आकलन होते. त्यांनी प्राप्त केलेले हे ज्ञान केवळ अभ्यासपुरते मर्यादित ठेवले नाही. त्याला त्यांनी भारतीय समाजाच्या वास्तवाशी जोडण्याचा प्रयत्न केला. भारतीय अर्थव्यवस्थेतील समस्यांचा सखोल अभ्यास करत त्यांनी त्यावर केवळ सैद्धांतिक चर्चा केल्या नाहीत तर प्रत्यक्ष उपायही सुचवले. द प्रॉब्लेम ऑफ द रुपी आणि द इव्हॉल्यूशन ऑफ प्रोव्हिंसियल फायनान्स इन ब्रिटीश इंडिया या त्यांनी लिहिलेल्या ग्रंथांमधून त्यांच्या अभ्यासाची खोली आणि व्यापकता दिसून येते.




'आर्थिक विषमता ही सामाजिक अन्यायाचे मूळ आहे. त्यामुळे विकासाचा केंद्रबिंदू हा केवळ उत्पादनवाढ नसून, समता आणि न्याय हा देखील त्याचा आधार असायला हवा. संपत्ती आणि संसाधने काही मोजक्या लोकांच्या हाती केंद्रीत झाली, तर समाजातील मोठा वर्ग वंचित राहील आणि सामाजिक असंतोष वाढेल, असे ते म्हणत असत. सार्वजनिक क्षेत्राचा विस्तार, उद्योगांचे राष्ट्रीयीकरण आणि संसाधनांचे समतोल वितरण यांद्वारेच सर्वसमावेशक विकास साधता येईल, असे ते म्हणायचे.

चलनव्यवस्था आणि वित्तीय धोरणांच्या बाबतीतही त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. द प्रॉब्लेम ऑफ द रुपी या ग्रंथातून त्यांनी ब्रिटिशकालीन भारतातील चलनातील अस्थैर्य आणि त्याचे परिणाम स्पष्ट केले. त्यांनी स्थिर आणि नियंत्रित चलनव्यवस्थेची गरज अधोरेखित केली. त्यांच्या विचारांचा प्रभाव भारतीय रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेत स्पष्टपणे दिसतो. १९३५ मध्ये स्थापन झालेल्या आरबीआयच्या संकल्पनेत त्यांच्या संशोधनाचा ठसा आहे.

महागाई आणि वित्तीय शिस्त याबाबतही आंबेडकरांचे विचार अत्यंत प्रासंगिक आहेत. त्यांच्या मते, महागाई ही गरीब आणि मध्यमवर्गीयांसाठी सर्वात मोठी समस्या आहे,

कारण ती त्यांच्या क्रयशक्तीवर थेट परिणाम करते. त्यामुळे सरकारने खर्चाचे योग्य नियोजन करून आणि वित्तीय धोरणे संतुलित ठेवून आर्थिक स्थैर्य राखले पाहिजे.

कृषी क्षेत्रातील समस्यांकडे त्यांनी अत्यंत संवेदनशीलतेने पाहिले. भारत हा कृषिप्रधान देश असल्यामुळे शेतीची स्थिती सुधारल्याशिवाय देशाचा विकास शक्य नाही, असे त्यांचे मत होते. जमिनीचे तुकडे करणे, सिंचनाची कमतरता आणि तांत्रिक मागासलेपणा यामुळे शेतीची उत्पादकता कमी राहते, हे त्यांनी ओळखले. लहान–लहान जमिनीमुळे उत्पादनक्षमता कमी होते आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे कठीण जाते. याचा सखोल अभ्यास करून त्यांनी स्मॉल होल्डिंग्ज इन इंडिया अँड देअर रिमेडिज या ग्रंथातून सहकारी शेती, सिंचन व्यवस्था आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर असे अत्यंत व्यावहारिक उपाय सुचवले. यांद्वारे शेती अधिक सक्षम करता येईल, असे ते म्हणत.

केवळ शेतीवर अवलंबून राहून देशाचा सर्वांगीण विकास साध्य होऊ शकत नाही. औद्योगिकीकरण हा विकासाचा मुख्य आधार असला पाहिजे. उद्योगधंद्यांच्या वाढीमुळे मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होते, उत्पादन वाढते आणि आर्थिक विषमता कमी होते, असे ते म्हणत. त्यांनी विशेषतः ऊर्जा, पायाभूत सुविधा आणि मोठ्या उद्योगांच्या विकासावर भर दिला होता. आजच्या 'मेक इन इंडिया' किंवा 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनांमध्ये त्यांच्या विचारांचे प्रतिबिंब स्पष्ट दिसून येते.

कामगार कल्याणाच्या क्षेत्रात आंबेडकरांचे योगदान अत्यंत क्रांतिकारक आहे. त्यांनी कामगारांच्या हक्कांना केंद्रस्थानी ठेवले. ८ तासांच्या कामाच्या वेळेचा नियम, किमान वेतन, सुरक्षित कामाचे वातावरण आणि सामाजिक सुरक्षा यांसारख्या संकल्पना त्यांनी प्रभावीपणे मांडल्या. महिलांसाठी प्रसूती रजा आणि कामगारांच्या कल्याणासाठी विविध योजना त्यांनी पुढे आणल्या. कामगारांना केवळ उत्पादनाचे साधन न मानता समाजाचा महत्त्वाचा घटक म्हणून पाहणे, ही त्यांची दृष्टी अत्यंत प्रगत होती.

जलनीती आणि ऊर्जा विकासाबाबतही त्यांनी दूरदृष्टी दाखवली. त्यांनी धरणे, जलसंधारण आणि सिंचन प्रकल्प यांना आर्थिक विकासाचा पाया मानले. दामोदर व्हॅली प्रकल्पासारख्या योजनांमधून त्यांच्या विचारांची अंमलबजावणी दिसून येते. त्यांच्या मते, पाणी आणि ऊर्जा हे केवळ संसाधन नसून विकासाचे मूलभूत साधन आहेत.

प्रादेशिक विकासाच्या बाबतीतही त्यांनी संतुलित विकासावर भर दिला. देशातील विविध प्रदेशांमध्ये आर्थिक असमानता असल्यास सामाजिक आणि राजकीय अस्थैर्य निर्माण होऊ शकते, हे त्यांनी ओळखले. त्यामुळे सर्व प्रदेशांचा समान विकास होणे आवश्यक आहे. स्थानिक संसाधनांचा योग्य वापर, पायाभूत सुविधा आणि शिक्षण–आरोग्य सेवा यांचा विस्तार यांद्वारे प्रादेशिक समतोल साधता येईल, असे त्यांनी सुचवले.

डॉ. आंबेडकरांनी आर्थिक लोकशाही ही संकल्पना मांडली, जी त्यांच्या आर्थिक विचारांचा गाभा आहे. त्यांच्या मते, राजकीय लोकशाही तेव्हाच टिकाऊ ठरते, जेव्हा प्रत्येक नागरिकाला आर्थिक संधींचा समान लाभ मिळतो. संपत्तीचे न्याय्य वितरण, रोजगारनिर्मिती, शिक्षण आणि सामाजिक सुरक्षा या माध्यमातूनच आर्थिक लोकशाही साध्य होऊ शकते.

आज 'भारताचा विकास' या संकल्पनेला नव्याने परिभाषित करत असताना, आंबेडकरांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. केवळ जीडीपी वाढल्याने विकास साध्य होत नाही, तर तो सर्वसामान्यांच्या जीवनमानात झालेल्या सुधारण्यावर अवलंबून असतो. ग्रामीण भागातील लोकांना संधी मिळणे, महिलांचे सशक्तीकरण, शिक्षण आणि आरोग्य यांचा विस्तार या गोष्टी विकासाच्या केंद्रस्थानी असायला हव्यात, असा संदेश डॉ. आंबेडकरांच्या विचारांतून स्पष्टपणे अधोरेखित होतो. आजच्या धोरणांमध्ये 'समावेशक विकास', 'शाश्वत विकास' आणि 'आत्मनिर्भर भारत' यांसारख्या संकल्पना दिसून येतात. या सर्व संकल्पनांचा पाया आंबेडकरांच्या आर्थिक विचारांत आढळतो. त्यांनी विकास आणि सामाजिक न्याय यांचा समन्वय साधण्याचा मार्ग दाखवला.डॉ. आंबेडकरांचे आर्थिक विचार हे आधुनिक भारताच्या विकासाचे दिशादर्शक तत्त्वज्ञान आहे. त्यांनी दाखवलेला मार्ग केवळ आर्थिक प्रगतीचा नाही, तर सामाजिक न्याय, समान संधी आणि मानवी सन्मान यांचा आहे. त्यांच्या विचारांची अंमलबजावणी केल्यासच खऱ्या अर्थाने समतोल, शाश्वत, सर्वसमावेशक विकास साध्य होऊ शकतो.

**(श्री. कानडे हे भाजपा प्रदेश आर्थिक प्रकोष्ठचे अध्यक्ष आहेत.)**

# भारताने गाठला अणुऊर्जा प्रवासातील महत्त्वाचा टप्पा

**६ एप्रिल** रोजी जगभरातील प्रमुख इंटेलिजन्स एजन्सीज्, आण्विक शक्ती तज्ज्ञ तसेच अनेक राष्ट्रप्रमुख, सुरक्षातज्ज्ञ, धोरणतज्ज्ञ, पर्यावरणवादी अशा सगळ्यांनी भारतात घडलेल्या एका घटनेची दखल घेतली. ती घटना होती कल्पक्कम येथील प्रोटोटाइप फास्ट ब्रीडर रिऍक्टर (PFBR) ने 'क्रिटिकलिटी' साध्य केल्याची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची ऐतिहासिक घोषणा. ही घोषणा म्हणजे भारताने आपल्या अणुऊर्जा प्रवासातील एक अतिशय महत्त्वाचा टप्पा गाठल्याचीच घोषणा होती. जगभरातील या तज्ज्ञ लोकांचे कान टवकारण्याचे कारण लक्षात घेतले, तर ही किती मोठी घोषणा आहे ते सहज लक्षात येईल.

जगभरात फास्ट ब्रीडर रिऍक्टर (यापुढे आपण FBR म्हणूया) कार्यक्रमांवर सुमारे १०० अब्ज (२००७ च्या अमेरिकन डॉलरमध्ये म्हणजे आजच्या मूल्याने अंदाजे १५०+अब्ज) खर्च करण्यात आला आहे, ज्यापैकी बहुतांश प्रकल्प अपयशी ठरले! अमेरिका, फ्रान्स, जपान, ब्रिटन, जर्मनी, इटली आणि इतर देशांतील मोठे FBR प्रकल्प रद्द करण्यात आले किंवा गंभीर तांत्रिक अडचणींमुळे, सोडियम लिकेजेस, आग लागल्याने लवकर बंद करण्यात आले.

ब्रीडर तंत्रज्ञान : पारंपरिक रिऍक्टरपेक्षा वेगळे, PFBR हे युरेनियम-२३८ या मूळ इंधनाचे प्लुटोनियम-२३९मध्ये रूपांतर करते. ही प्रक्रिया करायला लागणाऱ्या इंधनाच्या वापरा पेक्षा अधिक इंधन ही प्रक्रियाच पुन्हा तयार करते, असे डिझाइन केलेले आहे. म्हणजे मूळ इंधनाचा तुटवडा हा विषयच नाही. यात पुढच्या पायरीवर थोरियमचा वापर होतो आणि स्वच्छ ऊर्जा तयार करण्यात येते. कोळशाप्रमाणे थोरियम थेट वापरात येऊ शकत नाही, ते वापरण्यासाठी वरील प्रक्रिया आवश्यक असते. त्यात भारताला यश मिळाले आहे.

जगातील फक्त १% युरेनियम भारतात आहे, पण जगातील सर्वाधिक म्हणजे २५% थोरियमचा साठाही भारतातच आहे. (रामेश्वर-धनुष्यकोडी येथील 'रामसेतू' व परिसरात प्रामुख्याने व त्याच्या दोन्ही दिशेच्या शेकडो



किलोमीटर समुद्रकिनारी थोरियम डिपॉजिट आढळतात. हीच 'सोनिया की चिडीया' मनमोहन सरकारने अमेरिकेला विकायला काढली होती.) १ किलो थोरियममधून जितकी ऊर्जा मिळते, ती साधारणपणे ३० लाख किलो कोळसा जाळल्यावर मिळणाऱ्या ऊर्जेइतकी असते. पुढच्या ७०० वर्षांची भारताची ऊर्जा गरज भागवायची थोरियममध्ये क्षमता आहे असे अनेक संशोधनामध्ये गेल्या २० वर्षांत का म्हटले आहे, हे लक्षात येईल.

भारताकडे सुमारे ३ लाख ६० हजार टन थोरियम साठा असल्याचे अधिकृतपणे मानले जाते. हा अंदाज प्रामुख्याने किनारपट्टीवरील मोनाझाइट वाळूमध्ये (monazite sands) आढळणाऱ्या थोरियमवर आधारित आहे. भारताचा हा FBR दरवर्षी ३०० अण्वस्त्रांसाठी पुरेसा प्लुटोनियम तयार करू शकतो! त्यात DRDO चे शुद्ध शाकाहारी, साऊथ-इंडियन, सात्विक शास्त्रज्ञ साळसूदपणे तांत्रिक फरक सांगत आहेत की व्यावसायिक ऊर्जा रिऍक्टरमधून मिळणारे प्लुटोनियम reactor-grade असते तर अण्वस्त्रांसाठी weapons-grade प्लुटोनियम आवश्यक असते, ज्यासाठी वेगळी प्रक्रिया आणि तंत्रज्ञान लागते - जी 'आम्हाला तर माहितीच नाही. अशात, भारत सरकारची अधिकृत भूमिका पण आली आहे की आमचा FBR कार्यक्रम हा नागरी वापरासाठी असून टिकाऊ, कमी-कार्बन ऊर्जा निर्मिती वगैरे साठी आणि २०७० पर्यंत काही तरी 'नेट-झिरो' असे काही तरी उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आहे. असे पंतप्रधान मोदी यांनी पॅरिस, कोपनहेगन आदी ठिकाणी सांगितले आहे.

**- वेद कुमार**

# ठाणे-बोरिवली दुहेरी बोगदा प्रकल्पाच्या कामाला प्रारंभ

## ठाणे-बोरिवली प्रवासाचे अंतर आता फक्त १५ मिनिटांवर

**मुंबई** महानगर प्रदेशातील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी अत्यंत महत्त्वाकांक्षी मानल्या जाणाऱ्या ठाणे-बोरिवली दुहेरी बोगदा प्रकल्पाचा ऐतिहासिक टप्पा गाठला गेला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत ठाणे येथे बोगदा खोदकाम करणाऱ्या अवाढव्य 'टीबीएम' (Tunnel Boring Machine) यंत्रांचा लाँचिंग सोहळा दिमाखात पार पडला. यावेळी खा. नरेश म्हस्के, आ.निरंजन डावखरे, आ. संजय केळकर, ठाणे महापौर शर्मिला पिंपळोलकर आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी या प्रकल्पाचे वर्णन अभियांत्रिकी क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण टप्पा असे केले. ठाणे बाजूकडून 'नायक' आणि 'अर्जुन' या दोन टीबीएम मशिन्सच्या साहाय्याने या भुयारी मार्गाचे काम आता प्रत्यक्ष सुरू झाले आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाद्वारे (एमएमआरडीए) राबविल्या जाणाऱ्या या प्रकल्पाची एकूण लांबी ११.८४ किमी आहे. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाखालून जाणाऱ्या या दोन समांतर बोगद्यांमुळे (Twin Tunnels) बोरिवली आणि ठाण्यातील घोडबंदर रस्ता थेट जोडले जाणार आहेत. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या जैवविविधतेवर कोणताही विपरीत परिणाम होऊ नये, यासाठी हा मार्ग पूर्णपणे जमिनीखाली ठेवण्यात आला आहे. प्रकल्पांतर्गत सुमारे ११ हजार झाडांचे पुनर्रोपण/लागवड केली जाणार आहे. तसेच प्रवाशांच्या सुरक्षेसाठी प्रत्येक ३०० मीटरवर 'क्रॉस पॅसेज' आणि प्रगत अग्निशमन यंत्रणा बसवण्यात येणार आहे.

या प्रकल्पाचे सर्वात मोठे यश म्हणजे वेळ आणि इंधनाची बचत. सध्या ठाणे ते बोरिवली प्रवासासाठी ९० मिनिटे लागतात, ते या बोगद्यामुळे केवळ १५ मिनिटांवर येतील. हे अंतर २३ किमी वरून १२ किमीपर्यंत कमी होईल. नाशिक, कल्याण आणि नवी मुंबईकडून येणारी वाहने ठाणे शहराला वळसा घालून थेट या बोगद्यात प्रवेश करू शकतील. घोडबंदर रस्त्यावरील वाहतुकीचा ताण यामुळे लक्षणीयरित्या कमी होणार आहे.



या बोगद्याची रचना पूर्णपणे जमिनीखाली असल्याने, जैवविविधतेवर कोणताही विपरीत परिणाम होणार नाही याची खात्री केली गेली आहे. भरपाई वृक्षारोपणाचा (Compensatory Plantation) एक भाग म्हणून सुमारे ११ हजार झाडे लावली जातील, असे सांगून ते पुढे म्हणाले की, हा प्रकल्प आगामी 'ठाणे कोस्टल रोड' आणि इतर प्रमुख प्रादेशिक रस्ते जाळ्यांशी (Road Networks) एकात्मिक स्वरूपात जोडला जाणार असल्याने, राज्याच्या आर्थिक प्रगतीला आणि प्रादेशिक विकासाला मोठी चालना मिळणार आहे. त्याचबरोबर या प्रकल्पामुळे ठाण्यातील वाहतुकीसाठी थेट पर्यायी मार्ग (Bypass) उपलब्ध होणार आहे. वेळ आणि इंधनाची बचत होवून प्रत्येक प्रवासात ७५ मिनिटांपर्यंतची बचत होणार आहे. त्यामुळे इंधनाच्या वापरातही लक्षणीय घट होणार आहे. मुंबई, ठाणे, नवी मुंबई, कल्याण आणि नाशिक कॉरिडॉर्स (मार्गिका) यांच्यात, तसेच गुजरातशी अखंड जोडणी निर्माण होईल. ■

# मुंबई मेट्रो 2 बी च्या पहिल्या टप्प्याचे लोकार्पण व पॉड टॅक्सी प्रकल्पाचे ई भूमिपूजन

**मुंबईला** देशातील सर्वाधिक सुगम आणि एकात्मिक वाहतूक व्यवस्था असलेले शहर बनविण्याचा संकल्प असून मल्टी-मोडल इंटिग्रेशनच्या माध्यमातून नागरिकांना अखंड आणि सुलभ प्रवासाचा अनुभव देण्यावर राज्य शासनाचा भर असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुंबई मेट्रो लाईन २ ब (डी.एन. नगर ते मंडाले) चा पहिला टप्पा देशभक्त एन.जी. आचार्य उद्यान-डायमंड गार्डन ते मंडाले या मार्गाचे लोकार्पण तसेच पॉड टॅक्सी प्रकल्पाचे ई भूमिपूजन झाले.

चेंबूर येथील देशभक्त एन.जी. आचार्य उद्यान-डायमंड गार्डन मेट्रो स्थानक येथे झालेल्या या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, आ. सना मलिक, तुकाराम काते, मंगेश कुडाळकर, आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी मुंबई मेट्रो लाईन २ ब (डी.एन.नगर ते मंडाले) च्या कोनशिलेचे अनावरण तसेच पॉड टॅक्सीसंदर्भातील बीकेसी कनेक्ट कंपनीने तयार केलेल्या कॉफीटेबल बुकचे अनावरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले.

मेट्रो २ ब चा ५.६ किमीचा पहिला टप्पा आणि पाच स्थानके आजपासून सुरू होत असून उर्वरित दोन टप्पे पूर्ण झाल्यानंतर मुंबईत मोठ्या प्रमाणावर सुसंगत आणि जलद कनेक्टिव्हिटी उपलब्ध होणार आहे. या प्रकल्पामुळे पूर्व-पश्चिम तसेच उत्तर-दक्षिण मुंबई एकमेकांशी प्रभावीपणे जोडली जाणार असून, भविष्यात बीकेसी, अंधेरी, वांद्रे आणि चेंबूरपर्यंत अखंड प्रवास सुलभ होणार आहे. विशेष म्हणजे ही मेट्रो हार्बर लाईनला जोडणारी पहिली मेट्रो ठरत असल्याने वाहतूक व्यवस्थेत नवा अध्याय सुरू होत आहे.

या प्रकल्पातील सर्व स्थानके आयजीबीसी प्लॅटिनम मानांकित असून ऊर्जा बचत आणि नैसर्गिक प्रकाशाचा जास्तीत जास्त वापर यावर भर देण्यात आला आहे. मंडाले येथे उभारण्यात आलेला दुहेरी मजल्याचा डेपो देशातील सर्वात मोठ्या डेपोपैकी एक असून दोन



मजल्यांमध्ये ७२ लाईन्सची सुविधा उभारण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

मुंबई व मुंबई महानगर प्रदेशात एकूण ३३७ किमी मेट्रो नेटवर्क उभारण्याचे उद्दिष्ट असून, पूर्ण झाल्यानंतर दररोज सुमारे ७० लाख प्रवासी मेट्रोने प्रवास करू शकतील. त्यामुळे सध्या उपनगरी रेल्वेवरील ९० लाख प्रवाशांचा ताण मोठ्या प्रमाणात कमी होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

यावेळी बीकेसी परिसरात 'पॉड टॅक्सी' या नाविन्यपूर्ण लास्ट माईल कनेक्टिव्हिटी प्रकल्पाचे ई भूमिपूजन करण्यात आले. या स्वयंचलित प्रणालीद्वारे प्रवाशांना त्यांच्या गंतव्यस्थानी १००-१५० मीटर अंतरावर पोहोचता येणार असून, बीकेसीमधील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. हा प्रकल्प बीओटी तत्त्वावर राबविण्यात येणार असून, २० महिन्यांत पहिला टप्पा पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. कामात कोणताही अडथळा येऊ नये यासाठी संबंधित यंत्रणांनी तत्परतेने सहकार्य करावे, असे निर्देश त्यांनी दिले.

या प्रकल्पासाठी योगदान देणाऱ्या अभियंते, कामगार, कंत्राटदार आणि एमएमआरडीएच्या संपूर्ण टीमचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी विशेष कौतुक करत आभार मानले. ■

# नागपूर ते गोवा फक्त ८ तासांत

**■ महाराष्ट्र शक्तिपीठ महामार्गाच्या सुधारित आराखड्यास सरकारचा हिरवा कंदील**
**■ सातारा जिल्ह्याचा समावेश; १३ जिल्हे, ४० तालुके, २१ धार्मिक स्थळे जोडणार**

**मुख्यमंत्री** देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील पायाभूत सुविधा विकासाला नवे बळ मिळत असून, त्यांच्या महत्त्वाकांक्षी 'महाराष्ट्र शक्तिपीठ महामार्ग' प्रकल्पाच्या सुधारित आराखड्याला शासनाने मान्यता दिली आहे. वर्धा जिल्ह्यातील पवनार ते सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पत्रादेवी या मार्गाद्वारे उभारण्यात येणारा हा महामार्ग राज्याच्या विकासाला नवी दिशा देणारा ठरणार आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून साकारत असलेल्या या प्रकल्पामुळे नागपूर ते गोवा हा प्रवास अधिक जलद, सुरक्षित आणि सोयीस्कर होणार असून सध्याचा सुमारे १८ तासांचा प्रवास केवळ आठ तासांवर येणार आहे. धार्मिक, पर्यटन आणि आर्थिक विकासाला चालना देणारा हा महामार्ग राज्यासाठी 'गेमचेंजर' ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

'महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळा'ने विविध पर्यायांचा अभ्यास करून आणि इंडियन रोड काँग्रेसच्या निकषांनुसार हा सुधारित आराखडा तयार केला आहे. या विभागातील संबंधित मंत्री व लोकप्रतिनिधींसोबत चर्चा करून अंतिम निर्णय घेण्यात आला आहे. काही भागांत या महामार्गाला विरोध करण्यात येत होता. याच पार्श्वभूमीवर या मार्गाची सुधारित आखणी करण्यात आली.

### ८५६.७६ किमीचा महामार्ग, राज्यासाठी ठरणार 'गेमचेंजर'

या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचा विस्तार पवनार, जि. वर्धा ते पत्रादेवी, जि. सिंधुदुर्गपर्यंत करण्यात येणार असून एकूण लांबी सुमारे ८५६.७६ किमी असेल.

सुधारित आराखड्यात काही जिल्ह्यांमधील मार्गात बदल करण्यात आले आहे. यावेळी सातारा जिल्ह्याचा नव्याने समावेश करण्यात आला आहे.

यामुळे वर्धा, यवतमाळ, नांदेड, हिंगोली, परभणी, बीड, लातूर, धाराशिव, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सिंधुदुर्ग या १३ जिल्ह्यांतील ४० तालुके जोडले जाणार आहेत.



विशेष म्हणजे, माहूर, तुळजापूर आणि कोल्हापूर यांसारख्या प्रमुख शक्तिपीठांसह एकूण २१ धार्मिक स्थळे या मार्गाने जोडली जाणार आहेत.

### रद्द करण्यात आलेली ठिकाणे

'महाराष्ट्र महामार्ग अधिनियम १९५५' नुसार भूसंपादन करण्याच्या अनुषंगाने प्रसिद्ध केलेली प्राथमिक अधिसूचना रद्द करण्यात आली आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ, करवीर, हातकणंगले, कागल, भुदरगड, आजरा तालुक्यांतील मंजूर आराखड्यासाठी दि. १५ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या अधिसूचनेद्वारे रद्द करण्यात आली. त्यानंतर दि. २८ ऑगस्ट २०२५ रोजीच्या शासननिर्णयाद्वारे पवनार ते सांगलीदरम्यानचा आराखडा कायम ठेवून उर्वरित आराखड्याचे उपलब्ध सर्व पर्याय व संभाव्य पर्याय 'महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळा'ने तपासून शासनास सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते. ■

# खतांच्या अनुदानात वाढ

## आखाती युद्धसंघर्षाने टंचाईच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारचा निर्णय

**आखाती** युद्धामुळे निर्माण झालेल्या खत टंचाईच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत खरीप हंगाम २०२६ साठी फॉस्फेटिक आणि पोटॅसिक (स्फुरद आणि पलाश) खतांवरील पोषक तत्त्व आधारित अनुदान (एनबीएस) दर निश्चित केले. हंगामासाठी सुमारे ४१,५३३.८१ कोटी रुपयांचे अनुदान दिले जाणार आहे. ही रक्कम गतवर्षापेक्षा सुमारे ४,३१७ कोटी रुपयांनी अधिक आहे.

शेतकऱ्यांना अनुदानित, परवडणाऱ्या आणि वाजवी दरात खते उपलब्ध व्हावीत, यासाठी केंद्र सरकारकडून दरवर्षी खरीप आणि रब्बी हंगामासाठी खतांवरील अनुदान जाहीर केला जातो. अनुदान जाहीर झाल्यानंतर कंपन्या धोरण निश्चित करतात. खते आणि निविष्ठांच्या आंतरराष्ट्रीय किमतींमधील सध्याचा कल लक्षात घेऊन स्फुरद आणि पलाश खतांवरील अनुदानाचे सुसूत्रीकरण केले जाणार आहे. शेतकऱ्यांना या खतांची उपलब्धता परवडणाऱ्या दरात व्हावी, यासाठी खरीप २०२६ करिता मंजूर दरांनुसार एप्रिल ते सप्टेंबर या काळात डाय अमोनियम फॉस्फेट आणि नत्र, स्फुरद, पलाश ग्रेडसह स्फुरद आणि पलाश खतांवर अनुदान दिले जाईल.

### परवडण्याजोगे दर

सरकार खत उत्पादक, आयातदारांमार्फत शेतकऱ्यांना डीएपीसह २८ दर्जाची स्फुरद आणि पलाशयुक्त खते अनुदानित दरात उपलब्ध करून देते. युरिया, डीएपी, एमओपी आणि सल्फर या सारखी खते व निविष्ठांच्या आंतरराष्ट्रीय किमतींमधील सध्याचे कल लक्षात घेऊन, सरकारने डीएपी आणि एनपीकेएस ग्रेडसह फॉस्फेटिक आणि पोटॅसिक खतांसाठी एनबीएस दरांना मंजुरी दिली आहे. आखाती युद्धामुळे जागतिक बाजारात तयार खताच्या आणि खतांसाठीच्या कच्च्या मालाच्या किंमतीत वाढ झाली आहे. तसेच वरील अनुदानात युरियावरील अनुदानाचा समावेश नाही. त्यामुळे फक्त खरीप हंगामातील सर्व प्रकारच्या खतांवरील अनुदान एक लाख कोटी रुपयांवर जाईल. ■

# महाराष्ट्रात १ लाख ९१ हजार घरांवर सौर पॅनेल

**केंद्र** सरकारच्या पीएम-सूर्यघर मोफत वीज योजनेने राज्यात मोठी गती घेतली आहे. त्यानुसार आतापर्यंत आकडेवारीनुसार, राज्यात एकूण १ लाख ९१ हजार ५८५ निवासी ग्राहकांनी सौर संच बसवले आहेत. या यशाबद्दल केंद्र सरकार राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांना (ग्रामपंचायत, नगरपालिका, महापालिका) प्रत्येक सौर संचामागे एक हजार रुपये याप्रमाणे एकूण १९ कोटी १५ लाख ८५ हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान देणार आहे. दरमहा ३०० युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या कुटुंबांना शून्य वीजबिलाचा फायदा मिळावा, यासाठी केंद्र सरकारची प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना देशभर प्रभावीपणे राबविली जात आहे. या योजनेअंतर्गत छतावर सूर्यघर प्रकल्प बसविण्यासाठी वीज ग्राहकांना ३ किलोवॅटसाठी कमाल ७८ हजार रुपये अनुदान मिळते, तर प्रकल्प बसवण्यासाठी राष्ट्रीयकृत बँकांमार्फत विनातारण आणि कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध आहे. याच योजनेला स्थानिक स्वराज्य संस्थांनी प्रोत्साहन द्यावे, याकरिता प्रतिसूर्यघराकरिता १,००० रुपये प्रोत्साहन अनुदान दिले जाणार आहे.

**दहा हजारांपेक्षा जास्त सूर्यघर प्रकल्प झालेले जिल्हे**

**नागपूर :** ३०,२३२ (प्रोत्साहन अनुदान ३.०२ कोटी)
**जळगाव :** १४,४९४ (प्रोत्साहन अनुदान १.४४ कोटी)
**पुणे :** १३,८२० (प्रोत्साहन अनुदान १.३८ कोटी)
**छत्रपती संभाजीनगर :** १२,९४४ (प्रोत्साहन अनुदान १.२९ कोटी)
**नाशिक :** १२,४९३ (प्रोत्साहन अनुदान १.२४ कोटी)
**अमरावती :** १०,८४९ (प्रोत्साहन अनुदान १.०८ कोटी)






वर्धा– एसआयआर अभियान प्रदेश संयोजक व माजी खा. किरीट सोमय्या, प्रदेश उपाध्यक्ष व माजी खा. रामदास तडस, ज़िल्हाध्यक्ष संजय गाते, माजी खा. सुरेश वाघमारे, जिल्हा सरचिटणीस कमलाकर निंभोरकर, अशोक कलोडे, शहराध्यक्ष निलेश किटे आदी.




गंगापूर– प्रदेश सरचिटणीस सुनील राणे, आ. प्रशांत बंब, जिल्हाध्यक्ष संजय खंबायते, शेषराव जाधव, नंदकुमार गांधीले–पाटील आदी.




लातूर– डॉ. भागवत कराड, प्रदेश उपाध्यक्ष अर्चना पाटील–चाकूरकर, आ. अभिमन्यू पवार, जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील, माजी खासदार डॉ. सुनिल गायकवाड, प्रदेश प्रवक्ते गणेश हाके.




ठाणे– प्रदेश सरचिटणीस व एसआयआर ठाणे विभाग संयोजक ॲड. माधवी नाईक, आ. संजय केळकर, जिल्हाध्यक्ष संदीप लेले, संजय वाघुले आदी.

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp




प्रति,

**प्रेषक,**
**कार्यालय मंत्री :**
भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०, फॅक्स : ०२२-२२८५२३०५
ई मेल- bjpmaha.manogat@gmail.com